cmyk

द्वितीय वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सर्वांना... हार्दिक शुभेच्छा! – संपादक

गुढी पाडवा

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ०३ | अंक–३५७ | मंगळवार , दि.९ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ८ | किंमत ३ रूपये

# दिलासादायक! महाराष्ट्रात गव्हाचा विक्रम, प्रतिक्विंटलला मिळतोय चांगला दर

**पुणे । प्रतिनिधी**

**सध्या राज्यातील गहू उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. दिवसेंदिवस गव्हाच्या दरात वाढ होत आहे. सध्या प्रतिक्विंटल गव्हाला २५०० ते ३९०० रुपयांचा दर मिळत आहे. त्यामुळं गहू उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होत आहे. सरकारी हमीभावाचा विचार केला तर त्यापेक्षा बाजारात गहू २५ ते ३० टक्के अधिक दरानं विकला जातो आहे.**

अनेक बाजार समित्यांमध्ये गव्हाला सरासरी ३४५० रुपये प्रतिक्विंट असा दर मिळत आहे. तर सरकारने चालू वर्षासाठी गव्हाचा एमएसपी २२७५ रुपये ठेवला आहे. देशातील अनेक राज्यात गव्हाची खरेदी सुरु झालीय. अशातच गव्हाच्या दरात वाढ होत असल्यानं शेतकऱ्यांना फायदा मिळत आहे. महाराष्ट्रात नेमक्या गव्हाच्या किंमती का वाढतायेत असा प्रश्न तम्हाला पडला असेलच? तर महाराष्ट्रात गव्हाचे उत्पादन कमी होते. देशातील एकूण उत्पादनापैकी राज्यात फक्त २ टक्केच गव्हाचं उत्पादन होतं, म्हणून राज्याच गव्हाच्या किंमती वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळतंय. एमएसपीपेक्षा सध्या गव्हाचे दर अधिक आहेत. त्यामुळं एमएसपीवर गव्हाची विक्री करण्यापेक्षा बाजारात गव्हाची विक्री करणं शेतकऱ्यांना परवडत आहे.

मागील वर्षी पावसाचं प्रमाण कमी होतं. त्यामुळं अनेक ठिकाणच्या शेतकऱ्यांकडे गव्हाची लागवड करायला देखील पैसे नव्हते. तर काही शेतकऱ्यांनी लावलेल्या गव्हाला हवामानाचा मोठा फटका बसला. या दोन्ही गोष्टीचा गव्हाच्या उत्पादनावर मोठा परिणाम झालाय. सध्या गव्हाचे उत्पादन घटले आणि मागणीत वाढ झालीय. त्यामुळं दरात वाढ होताना दिसत आहे.

### राज्यातील अनेक शेतकऱ्यांचा कल गहू लागवडीकडे

एका बाजूला गव्हाचे दर वाढतायेत, तर दुसऱ्या बाजूला कांद्याचे दर घसरतायेत. त्यामुळं अनेक शेतकरी कांद्याची शेती सोडून गव्हाची शेती करत आहेत. गव्हाच्या पिकाकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसतोय. कारण सध्या गव्हाला अपेक्षीत दर मिळत आहे.




## सन्मान कर्तुत्वाचा... सन्मान मातीचा..!

बीडः दैनिक राज्य लोकतंत्र्याच्या वर्धापन दिनानिमित्त आदर्श शेतकरी आणि आदर्श सरपंच पुरस्कार वितरण सोहळा सोमवारी मोठ्या थाटामध्ये संपन्न झाला. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे आयोजित कार्यक्रमास आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डा. ओमप्रकाश शेटे, सामाजिक कार्यकर्ते गौतम खटोड, इन्फंट इंडियाचे संचालक दत्तामामा बारगजे, पसायदान सेवा प्रकल्प चे संचालक गोवर्धन दराडे, दैनिक लोकतंत्रचे निवासी संपादक गणेश मोकाशे, परमेश्वर येवले, बंडू खांडेकर आदी उपस्थित होते.

## गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर आज महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद, निर्धारनामा जाहीर करणार

**मुंबई प्रतिनिधी**

सांगली, भिवंडी लोकसभा मतदारसंघावरून महाविकास आघाडीत निर्माण झालेला वाद अजूनही मिटलेला नसला तरी मंगळवारी गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर आघाडीतील सर्व पक्षाच्या नेत्यांची संयुक्त पत्रकार परिषद होणार आहे. या पत्रकार परिषदेत आघाडीचे जागावाटप व एकदिलाने लढून भाजपा महायुतीला पराभूत करण्याचा निर्धारनामा जाहीर करण्यात येणार आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसने सांगली आणि भिवंडीतील आपले उमेदवार मागे घेतले जाणार नाहीत व मैत्रीपूर्ण लढतीचा प्रयत्न झाला तर राज्यात अन्यत्रही तसेच होईल असा इशारा दिल्याने काँग्रेसने सांगली, भिवंडी मतदारसंघावर पाणी सोडल्याचे संकेत मिळत आहेत. लोकसभा निवडणुकीच्या जागावाटपावरून महाविकास आघाडीत गेले २ महिने जागावाटपाची प्रक्रिया सुरू आहे.




## प्रकाश आंबेडकरांना कुकर तर महादेव जानकरांना शिट्टी चिन्ह

मुंबई : लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना आज केंद्रीय निवडणूक आयोगाकडून निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले आहे. यामध्ये वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख आणि अकोला लोकसभा मतदारसंघातून निवडणूक रिंगणात उतरलेल्या प्रकाश आंबेडकर यांना प्रेशर कुकर हे चिन्ह देण्यात आले असून रासपचे अध्यक्ष आणि परभणी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांना शिट्टी हे चिन्ह देण्यात आले आहे. तसेच बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेकडून अमरावती मतदारसंघातून शड्डू ठोकलेल्या दिनेश बूब यांनाही शिट्टी हे चिन्ह देण्यात आले आहे.




## सुटीची सुचना

आज दि.९ एप्रिल २०२४ रोजी दै.राज्य लोकतंत्रचा वर्धापन दिन असल्याने कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे उद्या दि.१० एप्रिल २०२४ रोजीचा अंक प्रसिध्द होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार व एजंट यांनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३५.५० क्विंटल | २,२५० | ३,१४५ | २,६६६ |
| ज्वारी/हायब्रिड :२१७.५० क्विंटल | १,६०० | ३,५०० | २,६६८ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : ८५.५० क्विंटल | ६,००० | १०,३०३ | ९,१८८ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: ४.५० क्विंटल | २,७२१ | २,७२१ | २,७२१ |
| चिंचोका/लोकल: ११.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन: १४२.०० क्विंटल | ४,५४० | ४,६०० | ४,५६३ |
| हरभरा: २२.५० क्विंटल | ५,३०० | ५,५२० | ५,४३० |







cmyk

## अग्रलेख

# दांडगाईचे राजकारण

महाराष्ट्रात जागावाटपाची रणधुमाळी अजून संपलेली नाही. एका-एका जागेसाठी महायुतीत चर्चेच्या फे-या झडत आहेत. महायुतीत ब-याच जागांवर खल सुरू आहे. खरी रस्सीखेच भाजप आणि शिवसेना शिंदे गटात सुरू आहे. आतापर्यंत ब-याच जागांचा तिढा संपलेला आहे, असे सांगण्यात येत असले तरी काही मोजक्या जागांवर अजूनही हमरीतुमरी सुरू आहे. कल्याणची जागा शिंदे गटाला सोडण्यात आली आहे मात्र, ठाण्यावर भाजपचा दावा कायम आहे. नाशिकच्या जागेवर भाजपसह शिवसेना आणि राष्ट्रवादीने दावा केला आहे. जागावाटपात भाजपने दांडगाई केल्याने शिंदे गटाचे मंत्री, आमदार संतापले आहेत. कुठल्या तरी सर्वेक्षणाचा आधार दाखवत शिवसेनेला हक्काचे मतदारसंघ नाकारण्यात आले. उमेदवार निवडीत हस्तक्षेप करून उमेदवार बदलण्यास भाग पाडण्यात आले. असेच प्रकार होत राहिले,

दादागिरी वाढत राहिली तर विधानसभा निवडणुकीसाठी आपले भविष्य अंधारमय आहे, अशी भीती शिंदे गटाला वाटू लागली आहे. आपल्याला उमेदवारी मिळेल की नाही, याबाबत शिंदे गटाचे आमदार चिंताग्रस्त झाले आहेत. भाजपने कितीही दबाव आणला तरी आपण ठाम भूमिका घ्यावी, अशी मागणी शिंदे गटाच्या नेत्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. शिवसेनेच्या मंत्र्यांची नुकतीच बैठक झाली. त्यात भाजपच्या दबावाला बळी न पडण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली. आपण सर्वांनी उठाव केल्यामुळेच भाजपला सत्तेत सहभागी होता आले याची जाणीव भाजपला करून द्यावी, असा विचार बैठकीत व्यक्त करण्यात आला. बैठकीत आघाडी धर्माची जाणीव करून देण्याचा प्रयत्न झाला. कोणत्या ना कोणत्या कारणाने सत्ता मिळवण्यासाठी एकत्र आलेले राजकीय पक्ष निवडणुकीच्या काळामध्ये मात्र आपला आघाडी धर्म विसरतात.

केंद्रीय किंवा राज्य स्तरावर जेव्हा कोणत्या एका पक्षाला स्वबळावर सत्ता मिळविणे शक्य होत नाही तेव्हा मित्र पक्षांची जमवाजमव करून आघाडीचे राजकारण केले जाते. सत्तेत सहभागी होताना सर्वांनाच छान वाटत असले तरी ऐन निवडणुकीच्या कालावधीत मात्र या आघाडी धर्माची कसोटी पाहिली जाते. केवळ सत्तेवर असलेल्या आघाडीमध्येच आघाडी धर्माची आव्हाने निर्माण होतात असे नाही तर विरोधकांच्या आघाड्यांमध्येसुद्धा अशा प्रकारचा अंतर्विरोध दिसून येतो. भाजपच्या दबावामुळे शिंदे यांच्या शिवसेनेला हिंगोलीत उमेदवार बदलावा लागला. वाशिम-यवतमाळमधून ५ वेळा निवडून आलेल्या भावना गवळी यांना उमेदवारी नाकारण्यात आली. परभणी, उस्मानाबादच्या जागा सोडाव्या लागल्या. रायगड, शिरूर हे मतदारसंघ हक्काचे असतानाही मित्र पक्षाला सोडावे लागले. ठाणे, संभाजीनगर जागांसाठी संघर्ष करावा लागत आहे त्यामुळे शिंदे गटात नाराजी आहे.

महाविकास आघाडीतही सांगली लोकसभा मतदारसंघावरून उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि काँग्रेस पक्ष यांच्यात जुंपली आहे. सातारा लोकसभा मतदारसंघामध्ये अजूनही उमेदवाराची घोषणा करण्यात आलेली नाही. सत्ताधारी महायुती असो की विरोधी महाविकास आघाडी त्यांच्या सर्व उमेदवारांची नावे निश्चित झालेली नाहीत. सर्वसाधारणपणे जेव्हा निवडणुकीच्या निमित्ताने असे विविध पक्ष एकत्र येतात तेव्हा संयुक्तपणे जागा वाटप केले जाते. त्या त्या ठिकाणी उमेदवार निश्चित केले जातात आणि संयुक्तपणे त्याची घोषणा करतात. या वेळी प्रथमच असे घडले की, प्रत्येक आघाडीतील घटक पक्ष स्वतंत्रपणे आपल्या जागांची घोषणा करीत राहिला. लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच उद्धव ठाकरे यांनी सांगली मतदारसंघातून पहिलवान चंद्रहार पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा केली. प्रत्यक्षात हा मतदारसंघ काँग्रेससाठी राखीव आहे. भाजपने अजित पवार गट असो की एकनाथ शिंदे गट, त्यांच्या जागा कमी करून कमळ चिन्हावर जास्तीत जास्त जागा लढवल्या जाव्यात यासाठी प्रयत्न सुरू केले त्यामुळे असंतोष निर्माण झाला. नवनीत राणांच्या जात प्रमाणपत्रावर कोर्टाने प्रश्नचिन्ह निर्माण केले; पण राणांनी महाशक्तीची आराधना करताच व भाजपमध्ये प्रवेश करताच त्यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरले. हा चमत्कारच म्हणावा लागेल. काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांना मात्र जात प्रमाणपत्राबाबत दिलासा मिळूनही निवडणूक लढवण्यास अपात्र ठरल्या. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते, आमदार एकनाथ खडसे लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. आपण स्वगृही परतणार आहोत, असे ते म्हणाले. खडसे आणि गिरीश महाजन यांचे जमत नाही. खडसे यांच्या प्रवेशासंबंधी त्यांना विचारण्यात आले तेव्हा महाजन म्हणाले, खडसेंकडे गावातील ग्रामपंचायतही नाही. त्यांच्या पत्नीचा पराभव झाला. विधानसभा निवडणुकीत मुलगीही पराभूत झाली, बँकेची सत्ताही गेली. त्यांच्याकडे काय राहिले आहे? जो दिवा विझलेला आहे त्याच्याबद्दल एवढं का विचारता? महाजनांचा सवाल रास्त असला तरी महाशक्तीच्या प्रभावामुळेच खडसेंना स्वगृही परतावे लागत आहे. हा सारा महाशक्तीचा महिमा आहे.

# कंकालेश्वर महोत्सवात यावर्षी भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी

**बीड। प्रतिनिधी**

**संस्कार भारती देवगिरी प्रांत जिल्हा बीड च्या वतीने गेल्या २७ वर्षापासून अखंड सादर होणारा महोत्सव म्हणजे कंकालेश्वर महोत्सव होय यंदाचे २८ वे वर्ष असून यावर्षी नृत्याविष्कार नृत्य झंकार पुष्पवृष्टी स्वराविष्कार ढोल पथक सादरीकरण असे भरगच्च कार्यक्रम चैत्र पाडव्याच्या दिवशी आयोजित केले आहेत.**

संस्कार भारती बीड च्या वतीने बीड शहराच्या सांस्कृतिक वैभववात नवचैतन्य निर्माण करणारा आणि भर घालणारा महोत्सव म्हणून कंकालेश्वर महोत्सवाकडे पाहिले जाते गेल्या २७ वर्षापासून अखंडपणे सादर होणारा महोत्सव म्हणून याची विशेष नोंद देवगिरी प्रांतात झालेली आहे यावर्षी मातृशक्ती प्रमुख श्रीमती स्नेहलताई पाठक यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे प्रांताध्यक्ष भरत अण्णा लोळगे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी ९ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजता कंकालेश्वर महोत्सव आयोजित केला आहे. गेल्या २७ वर्षापासून कंकालेश्वर महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे जलाशयातील तरंगता रंगमंच होय या रंगमंचावर यंदा मृण्मयी नृत्य निकेतन छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने भरतनाट्यम नृत्यविष्कार तसेच लोककलेचा कलाविष्कार बंजारा नृत्य आणि महाराष्ट्राची लोकधारा वासुदेव नृत्य हा नृत्य झंकार त्याचप्रमाणे प्राध्यापक दिलीप दोडके आणि सहकार यांचे सुश्राव्य गायन त्याचप्रमाणे नववर्षाचे स्वागत कंकालेश्वर मंदिरावर पुष्पवृष्टी करून होणार आहे. धर्मयोद्धा रणरागिणी ढोल पथकाच्या वतीने मंदिराच्या परिसरात तरंगत रंगमंचावर ढोल पथकाचे सादरीकरण देखील होणार आहे. बीड शहराच्या सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या या कंकालेश्वर महोत्सवाचे साक्षीदार होण्यासाठी बीडकर रसिकांनी हजारोंच्या संख्येने चैत्र पाडव्याच्या दिवशी सायंकाळी सहा वाजता आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन संस्कार भारती बीड च्या वतीने करण्यात आले आहे.

# जयभिम महोत्सवातील स्पर्धांना प्रतिसाद

## शेकडो विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

**राज्याला आदर्श घालून दिलेल्या बीड जयभिम महोत्सवात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा पार पडल्या. या दोन्ही स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला. दोन्ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने सुयोग्य नियोजन केले होते.**




डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बीडमध्ये १ एप्रिल ते १४ एप्रिल या कालवधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात रविवार (दि.७) एप्रिल रोजी तुलसी महाविद्यालयात महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदवला होता. महापुरुष परीक्षेचे पर्यवेक्षक म्हणून सुमेध जोगदंड, गणेश सरवदे यांनी काम पहिले. वक्तृत्व स्पर्धेला परीक्षक म्हणून डॉ.पांडुरंग सुतार, प्रा.विक्रम धन्वे, अ‍ॅड. सुरेश वडमारे यांनी काम पहिले. या वक्तृत्व स्पर्धेचे सूत्रसंचालन सचिन वडमारे, आभार सुमेध जोगदंड यांनी केले. या दोन्ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने सुयोग्य नियोजन केले होते.जयभिम महोत्सवातील कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे. बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे आज मंगळवार (दि.९) रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत भीमगीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली असून सायंकाळी ६ वाजता प्रा.आशालता कांबळे यांचे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाला सहभागी व उपस्थित रहावे असे आवाहन जयभिम महोत्सव समितीकडून करण्यात आले आहे.




# शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी बाळासाहेब मिसाळ

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षांमध्ये दोन गट पडल्याने दोन्ही गटाच्या वतीने पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे पहावयास मिळत आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (शरदचंद्र पवार गट) पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी आष्टी तालुक्यातील हातोळण बाळासाहेब मिसाळ यांनी शरदचंद्र पवार पक्षासाठी आजपर्यंत दिलेल्या योगदानाची दखल घेऊन प्रदेश उपाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.

तालुक्यातील बाळासाहेब मिसाळ हे २०१९ पासून शरदचंद्र पवार यांचे व पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी अग्रेसर आहेत.मिसाळ यांनी बहुजन मुक्ती पार्टी मध्ये अनेक वर्ष काम केले.२०१९ साल पासून ते शरदचंद्र पवार यांच्या सानिध्यात राहून त्यांचे विचार व पक्षाचे ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पौहचविले व पक्षाची एकनिष्ठता व आणि सर्वसामान्य नागरीक कार्यकर्ता मधला जनसंपर्क यामुळे त्यांच्यावर आता प्रदेश उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.यावेळी प्रदेश सरचिटणीस रवींद्र पवार, राजेंद्र वैद्य, प्रभारी रायगड व प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, महिला विभागीय अध्यक्षा भावना घाणेकर, संभाजी गांगर्डे, मनोहर वाघ, जगन्नाथ वाघ कामगार नेते भाई संतोष घरत,डॉ. राजेंद्र कवठेकर, तुषार वाघ, गणेश चौधरी, शितल खाडे, सत्यनारायण बिरादार, राजेंद्र इंगोले,ह.भ .प देशमुख महाराज शेखर मगर आदी मान्यवर उपस्थित होते.बाळासाहेब मिसाळ यांच्या निवडीबद्दल आ संदिप क्षिरसागर, माजी आ साहेबराव दरेकर,लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे,बबन गिते,राम खाडे, तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, जिल्हा सरचिटणीस संजय थोरवे यांचासह आदींनी अभिनंदन केले आहे.

# मराठी वर्ष शालिवाहन कालगणनेचे!

**वर्ष सुरु होण्याचा दिवस अर्थात १ जानेवारी हे जगाच्या दृष्टीने नववर्ष आहे मात्र भारतीय परंपरेत विविध धर्मात वेगवेगळ्या दिवशी वर्ष सुरू होतं. यात मग मराठी पंचांगानुसार येणारं नववर्ष भारतात वैज्ञानिक आधार असणारं भारतीय सौर वर्ष तसेच इतर धर्मियांमध्ये इस्लाम तसेच पारसी नववर्षे आधी आपण बघतो आता वैश्विक रूपात कालगणना ही आर्थिक बाबींची झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कॅलेंडरचा स्वीकार करण्यात आला साधारण नववर्ष एक जानेवारी आहे**

सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न आणि हजारो वर्षांचा इतिहास असणारा आपल्या संस्कृती संपन्न देश यातही नानाविध धर्म यात सर्वमान्य पद्धती म्हणजे चंद्र आधारित कालगणना या कालगणनेत सहा ऋतू आणि १२ महिने यात विभागलेले आपले वर्षे आणि याची सुरुवात अर्थात चैत्र महिन्याच्या प्रतिपदेपासून म्हणजेच गुढीपाडव्यापासून होते. प्रतिपदा अर्थात महिन्याचा पहिला दिवस म्हणून पाडवा आणि पहिला महिन्याचा पहिला दिवस साजरा करताना व नव्या वर्षाचे स्वागत करताना गुढी उभारण्याची आपली परंपरा म्हणून हा गुढीपाडवा.

यंदा नववर्ष अर्थात गुढीपाडवा ९ एप्रिल रोजी येत्या मंगळवारी आहे. आपण शालिवाहन राजाने सुरू केलेले वर्ष गणना वापरतो वर्ष अर्थात शक-संवत्सर त्यानुसार ९ एप्रिल रोजी आपण गुढीपाडव्यापासून शालीवाहन शक १९४६ मध्ये प्रवेश करणार आहोत. याच सोबत देशात



दिवाळीपासून नववर्षे साजरे करून कालगणना वापरली जाते ती गणना म्हणजे विक्रम संवत्सर होय. दोन महान पराक्रमी सम्राटांनी सुरू केलेल्या या कालगणना आहेत.

महाराष्ट्र आणि कोकणसह गोवा यात निसर्गाचं नातं सांगणारे सण आहेत. फाल्गुन महिन्यात रंगाचा सन रंगपंचमी त्या आधी होळीचा सण आणि त्यानंतरचे हे नववर्षाचे आगमन अर्थात चैत्रात वनराईत येणाऱ्या नव्या चैत्रपालवीच्या स्वागताचा उत्सव. निसर्गचक्राची जुळवून ठेवलेली ही सणांची परंपरा निसर्गातील मावळत्याचा उत्सव करते. त्याच उत्साहात नव्याचे स्वागत देखील करते त्या साऱ्यांचा मिलाप या कालावधीत आपणास दिसतो. सूर्य तळपत एका बाजूला अंगाची लाही-लाही करीत असताना निसर्ग मात्र आपली वाटचाल दमदारपणे वसंतऋतूत सुरू करीत असतो. पाना-फुलांच्या रूपाने होणारी रंगाची उधळण एक अनोखी रंगपंचमी सादर करते तर असमंताच्या रंगभूमीवर सूर्य चंद्र आणि मेघ यांचे एक विलक्षण वेधक नाट्य देखील हा काळ आपणास दाखवत असतो. स्वतःची खास अशी खाद्य संस्कृती जपणाऱ्या या भागात वाढत जाणाऱ्या उन्हासोबत जुळवून घेताना उन्हाळी फळ आणि उन्हाळ्यात करायची बेगमीचा हा काळ यात 'बेगमी' हा शब्द खास कोकणचा यापुढील ऋतू पावसाळ्याचा राहणार असल्याने त्या काळात मासेमारी बंद व झिम्माड पाऊस यामुळे घरात राहण्यासाठी वेगवेगळे खारवणाचे वाढलेले पदार्थ तयार करून ठेवणे म्हणजे 'बेगमी' होय

साधारणपणे कालगणना बघितल्यास सर्वच कॅलेंडर हे साधारण २००० ते २१०० वर्षे जुने आहेत पण इतिहासाचा धांडोळा घेताना आपली संस्कृती त्याहीपेक्षा जुनी आहे. याचे पुरावे आपल्या आसपास असलेला ऐतिहासिक आणि भव्यदिव्य अशा वास्तूवरून देता येतात. कालगणना आपल्या दैनंदिन आयुष्यात काल आणि आज यातलं अंतर मोजण्याचे एक साधन आहेत. इतकचं याचं महत्त्व नाही तर त्याच्याशी निगडित जीवन संस्कृती आपण विकसित केली आहे.

कालगणना एक प्रकारे संस्कृती स्थिरावल्याचं चिन्ह आहे. कोणी एकेकाळी जंगलामधून वस्ती करून राहणारा मनुष्यप्राणी नंतरच्या काळात गुंफामधून प्रथम टोळ्या आणि भटक्या समूहात रूपांतरित होत पाण्याकाठी स्थिरावला नदी आणि शेती यांच्या जोडीने शब्द-जाणीवा यामधून ग्राम आणि नगरांची रचना करून राहू लागला. त्या काळातच कला, क्रीडा आणि निगडित सांस्कृतिक गुणांचा परिचय घडला व यालाच जीवनशैलीचं रूप देताना निसर्गाशी नातं सांगत त्याने सण आणि उत्सव यांची नवी परंपरा सुरू केली. या साऱ्यांना काळाच्या पट्टीत बांधताना पुढे समाजाचे नेतृत्व करणाऱ्या राजे व सम्राटांनी आपापल्या कालगणना सुरू केलेल्या आहेत.

भिन्न वैचारिक मान्यता आणि त्याचा विस्तार यातुन याच काळात धर्माचे अवतरण झालं आणि त्या धर्म वर्चस्वाचा लढा आजवर जगात सर्वत्र उघड तर कुठे छुप्या पद्धतीने सुरू आहे पण यापेक्षा जीवन श्रेष्ठ आहे असे मानणारे मात्र या फदांत न पडता आपापल्या संस्कृतीत रमले आहेत हे देखील खरं.

शालिवाहन शक तसं आपल्याला अधिक जवळचे आहे कारण सम्राट शालीवाहन हा याच भूमीतील सम्राट होय. शालेय प्रतिष्ठान नगरीचा राजा अर्थात ज्याला आपण पैठण म्हणून ओळखतो.

सातवाहन वंशातील शालिवाहन राजाने आपल्या काळात या कालगणनेची सुरुवात केली. सातवाहन सम्राटांचा व वंशाचा कालावधी साधारण ३०० वर्षांचा असल्याची नोंद आहे. सातवाहन काळात देशात इतरत्र मातृसत्ताक पद्धती असली तरी सातवाहननांनी पितृसत्ताक पद्धतीचा अवलंब केला होता. त्यांच्या शासन काळात ब्राह्मी प्राकृत ही भाषा प्रचलनात होती. या साम्राज्याच्या काळातच आज विश्ववारसा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजिंठा आणि वेरूळ मधील लेण्या कोरण्यात आल्याची नोंद आहे. शालिवाहन सम्राटांनी आपल्या काळातील चलनासाठी चांदी, तांबे आदी धातूंच्या नाण्यांना प्रचलनात आणले. सर्वात महत्त्वाचा अर्थात स्वतःची स्वतंत्र कालगणना सुरू केली. त्यानुसार आपण आता चैत्र प्रतिपदेपासून नव्या वर्षाला सुरुवात करतो.

हिंदू धर्मात वर्षभरात जे महत्त्वाचे साडेतीन मुहूर्त सांगितले आहेत. त्यातील एक आणि पहिला पूर्ण मुहार्ताचा दिवस म्हणजे गुढीपाडवा होय. नव संवत्सरासोबत गृहप्रवेश, वाहन खरेदी इतर साहित्य खरेदी व नव्याची मुहूर्तमेढ या दिवशी करण्याची परंपरा महाराष्ट्रात आहे.

**प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड
मो.९८२३१९९४६६

# महाराष्ट्र खो- खो असो.च्या संयुक्त चिटणीसपदी बीडच्या वर्षा कछवा

**बीड। प्रतिनिधी**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची २०२४ ते २०२८ या कालावधीकरिता निवडणूक जाहीर झाली होती. ही निवडणूक शिवछत्रपती क्रीडा नगरी सभागृह ,बालेवाडी पुणे या ठिकाणी पार पडली. या निवडणुकीत सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले. या निवडणुकीमध्ये अध्यक्षपदी-संजीवराजे नाईक निंबाळकर (सातारा),कार्याध्यक्ष - सचिन गोडबोले (पुणे), सरचिटणीस-डॉ.चंद्रजीत जाधव (धाराशिव), खजिनदार गोविंद शर्मा तर बीडच्या श्रीमती वर्षा कछवा यांची संयुक्त चिटणीसपदी बिनविरोध निवड झाली. एमॅच्युअर खो-खो असोसिएशन,बीड चे सचिव विजय जाहेर यांची शासकीय परिषद सदस्य म्हणून निवड झाली. याबद्दल शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त मार्गदर्शक प्रा.जे.पी शेळके , असो .चे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेश शिंदे, कैलास गवते ,सचिव विजय जाहेर, कोषाध्यक्ष योगेश सोळसे, सहसचिव मनोज जोगदंड,नितीन येळवे , प्रा .राजेंद्र बरकसे, डॉ. केतन गायकवाड, विजय अपसिंगेकर ,प्रा. रविंद्र खरात, बापूसाहेब तारुकर, प्रफुल्ल हाटवटे, रवींद्र सोनवणे, अशोक चौरे, शिवराज देवगुडे,अविशांत कुमकर, रमेश पिसाळ आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मल्हारराव होळकर यांनी होळकरशाहीचे वैभवशाली राज्य निर्माण केले-प्रदिप खडके

**माजलगाव । प्रतिनिधी**

**महाराजे मल्हारराव होळकर यांनी अत्यंत सामान्य कुटुंबातुन स्वकर्तुत्वावर होळकर शाहीचे वैभवशाली राज्य निर्माण केले असल्याचे मत प्रदीप खडके यांनी व्यक्त केले. मल्हार सेना प्रणित महाराजा मल्हारराव होळकर यांचा जन्म उत्सव आणि राजे मल्हारराव होळकर सामाजिक राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण वैष्णवी मंगलकार्यालयात दि.६ एप्रिल २०२४ शनिवार रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजित कार्यक्रमात खडके बोलत होते.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले होते. तर प्रमुख अतिथी म्हणून आ.प्रकाश सोंळके ,भाजपचे नेते रमेशराव आडसकर, बहुजन नेते बाबुराव पोटभरे , सभापती अशोकराव डक,मानवी हक्क अभियान चे जिल्हाध्यक्ष राजेश घोडे माजी जिल्हा परिषद बबनराव सरवदे, विशाल देवकते, नारायणराव सातपुते, सतिष देवगुंडे, श्रीहरी मोरे,मिनाताई देवकते, नवनाथ धायजे, उपस्थित होते. राजे मल्हारराव होळकर यांच्या प्रतिमा पूजन आणि दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते शैक्षणिक क्षेत्रात मराठवाड्यात




आदर्श असं काम असलेले प्रदीप जी खडके सर यांना राजे मल्हारराव सामाजिक राज्यस्तरीय पुरस्काराने यावेळी त्यांना भेटा शाल पुष्पहार मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.या वेळी पुढे बोलताना खडके म्हणाले की आज पर्यंत मला अनेक पुरस्कार मिळाले माझे सन्मान झाले परंतु आज माझ्या बीड जिल्ह्यात राजे मल्हारराव होळकर सामाजिक राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केल्याने हा सर्वात मोठा बहुमान आहे व याचा मला अभिमान आहे असे सांगत या पुरस्काराच्या प्रेरणेने मी अधिक सामाजिक काम मोठ्या गतीने करणार असल्याचे सांगत लोकमाता राष्ट्रमाता अहिल्याबाई होळकर नावाने या जिल्ह्यात सहकारी साखर कारखाना उभारणीचं माझं स्वप्न असल्याचे सांगून समाजातील गोरगरीब होतकरू विद्यार्थ्यांना माझ्या प्रतिष्ठानच्या वतीने मी शैक्षणिक मदत करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले यावेळी रमेशराव आडसकर बहुजन नेते बाबुराव पोटभरे तुकाराम येवले राजेश घोडे यांचेही समायोजित भाषणे झाले या कार्यक्रमास उपप्राचार्य लक्ष्मीकांत सोन्नर, व्याख्याते बाळासाहेब सोनसळे, पंडितराव खोडवे, भगवान धरपडे, अशोक नवघरे, पंकज पेंटर, शामसुंदर पांचाळ, प्रविण गवते, उध्दव कुंडकर, हनुमान सरवदे, यांच्या सह महीला, पुरूष युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सोनिजवळा येथे मुस्लिम बांधवांना इफ्तार पार्टीचे आयोजन

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सोनिजवळा येथे जामा मस्जिद मध्ये मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. मुस्लिम बांधवांचा पवित्र महिना असणारा रमजान महिन्याचे उपवास सुरू आहेत या निमित्ताने सोनिजवळा येथील जामा मस्जिद मध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते, सोनिजवळा येथे हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडवतात,दिवाळी, रमजान, सप्ताहा ईद सर्व समाज बांधव एकत्र साजरी करून भाई चारा कायम निभवताना दिसत आहेत,या वेळी युसुफ वडगाव पोलीस स्टेशनचे . शेंडगे साहेब, चे समुंदे साहेब, मेहेत्रे साहेब, मा सरपंच मुकुंद गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य तथा अंबाजोगाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक मिनाज पटेल, बाळासाहेब कोकाटे, चेअरमन मनोहर गिरी, व्हाइस चेअरमन हुसेन पटेल, पत्रकार दशरथ चवरे,अब्दुल सत्तार साहेब, देविदास जोगदंड (ग्रा प सदस्य), जब्बार शेख (ग्रा प सदस्य), आसेफ पटेल व आसेफ पठाण या वेळी गावातील सर्व जाती धर्माचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते या इफ्तार पार्टीचे आयोजन मुकुंद गायकवाड,मिनाज पटेल, बाळासाहेब कोकाटे,दशरथ चवरे यांनी केले होते.


दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
✻ शुभेच्छुक ✻
ॲड.सतिश शिंदे
संस्थापक प्रमुख
अजयभैय्या शिंदे
बीड जिल्हा प्रमुख तथा
सरपंच मालीपारगाव
समाज हितासाठी समाज संघटन...
महात्मा फुले युवा दल


दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
तिरूपती ट्रेडर्स
बीड-पिंपळनेर रोड,म्हाळस जवळा
ता.जि.बीड


दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
-:: शुभेच्छुक ::-
अरविंद कल्याण दुबाले
कनिष्ठ अभियंता श्रेणी २
ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,बीड


दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
-:: शुभेच्छुक ::-
संतोष जाधव
उपजिल्हा प्रमुख शिवसेना बीड जिल्हा


दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
दररोज ५०० रुपये भरा
आणि भविष्यात कर्ज मिळवा
आताच रोज थोडे-थोडे पैसे बाजूला काढून ठेवा
एक दिवस पैसे होतील मोठे !
संघमित्रा अर्बन
को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि.माजलगाव


दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
---० शुभेच्छुक ०---
सुशिल (भैय्या) डक
युवा नेते, माजलगाव


दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
-:: शुभेच्छुक ::-
शिवाजी सिरसाट
घाटनांदूर जिल्हा परिषद सर्कल


दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
-:: शुभेच्छुक ::-
आदित्य पाटील
माजी नगराध्यक्ष, केज


सौ.लक्ष्मी संजय केदार
सरपंच सांगवी (सा.)
श्री.राम पंढरी बिक्कड
उपसरपंच सांगवी (सा.)
सदस्य
दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
संजय केदार
युवा नेतृत्व
राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी
श्री.हरीदास तुळशीराम धस
सौ.प्रभावती नवनाथ धस
सौ.जया विलास धस
सौ.निर्णानाबाई बाबुराव केदार
श्री.अंगद सखा गायकवाड
सौ.किसकिंदा महादेव केदार
ग्रामपंचायत कार्यालय सांगवी (सारणी) ता.केज.जि.बीड


दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!
राहुल जगताप
माजी आ.बाजिराव जगताप
----:: शुभेच्छुक ::----
मा.मोहनराव जगताप
भाजपा माजलगाव विधानसभा प्रमुख तथा
व्हा.चेअरमन छ.स.सा.का. सावरगाव,ता.माजलगाव, जि.बीड

# देशात जीएम मका लागवडीला परवानगी द्या

## पोल्ट्री उद्योगाची केंद्राकडे मागणी!

पुणे : पोल्ट्री खाद्य निर्मिती उद्योगाला सध्या मकाची काहीशी कमतरता जाणवत असून, देशभरात मकाचे दर चढेच आहे. अशातच गेल्या वर्षभरात मकाचा इथेनॉल निर्मितीसाठी वापर वाढला आहे. ज्यामुळे पोल्ट्री खाद्य निर्मिती उद्योगाला सध्या मका टंचाईला सामोरे जावे लागत आहे. परिणामी, येत्या काळात मका पिकाचे महत्व वाढणार आहे. मका टंचाई दूर करण्यासाठी काही देशांनी जीएम मका, सोयाबीन शेतीला परवानगी दिली आहे. अलीकडेच चीनने देखील जीएम मका लागवडीला परवानगी दिली आहे. त्यामुळे भारतात देखील जीएम मका लागवडीला परवानगी देण्यात यावी. अशी मागणी पोल्ट्री उद्योगाकडून केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे.

पोल्ट्री फेडरेशन या देशातील आघाडीच्या संघटनेसह कंपाउंड लाइव स्टॉक फीड मैन्युफैक्चर्स एसोसिएशन आणि पोल्ट्री फेडरेशन ऑफ इंडिया या संघटनांनी केंद्र सरकारकडे जीएम मका लागवडीला देशात परवानगी देण्याची मागणी केली आहे. याशिवाय सध्याच्या घडीला जाणवणारी मका टंचाई कमी करण्यासाठी मका आयातीवरील शुल्क १५ टक्क्यांनी कमी करण्यात यावे, असेही या




संस्थांनी केंद्र सरकारला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे. विशेष म्हणजे मका आयातीबाबत या संघटनांनी या आधीही केंद्र सरकारला पत्र लिहिले होते. तर कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री या संघटनेने देखील जीएम मका लागवडीला परवानगी देण्याची मागणी आधी केलेली आहे. पोल्ट्री

### केंद्र सरकारकडून कानाडोळा

दरम्यान, भारतामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून जीएम मका उत्पादनाला परवानगी देण्याची मागणी केली जात आहे. याशिवाय मका आयात शुल्कात कपात करण्याची देखील मागणी वारंवार केली जात आहे. मात्र, सरकारकडून या दोन्ही मागण्यांकडे कानाडोळा केला जात आहे. विशेष म्हणजे सरकारने याकडे गांभीर्याने न पाहिल्यास येत्या काळात देशातील पोल्ट्री उद्योग धोक्यात येण्याची शकयता आहे. असेही या संघटनांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

उद्योगातील जाणकारांच्या माहितीनुसार, भारतात दरवर्षी ३४.६० दशलक्ष टन इतके मका उत्पादन होते. या उत्पादनाच्या माध्यमातून देशातील पोल्ट्री उद्योगासह देशातील अन्न सुरक्षा पूर्ण करण्यास असक्षम आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये भारतातून एकूण ६.६५ लाख टन पोल्ट्री खाद्य निर्यात करण्यात आले. ज्याची एकूण किंमत १०८१.६२ कोटी रुपये इतकी आहे. अशातच यंदा देशातील मका इथेनॉल उद्योगाकडे वळला आहे. त्यामुळे चिंतेत आणखीनच वाढ झाली आहे.

# कापूस दर पुन्हा नरमले, ८ हजाराच्या आत घसरण



पुणे : राज्यात लोकसभा निवडणुकीच्या प्रचार मोहिमेने जोर धरला आहे. याउलट राज्यातील कापूस दरात पडझड सुरूच आहे. गेले काही दिवस ८ हजारांच्या वरती गेलेले कापूस दर पुन्हा खाली घसरले आहे. सोमवारी देउळगाव राजा बाजार समितीत कापसाला राज्यातील सर्वाधिक कमाल ८००० रुपये ते किमान ७००० रुपये तर सरासरी ७८५० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला आहे.

राळेगाव (यवतमाळ) बाजार समितीत आज ४९०० क्विंटल आवक झाली असून, कमाल ७७५० रुपये ते किमान ७००० रुपये तर सरासरी ७६२५ रुपये प्रति क्विंटल दर मिळाला आहे. मारेगाव (यवतमाळ) बाजार समितीत आज ४७७ क्विंटल आवक झाली असून, कमाल ७७५० रुपये ते किमान ६९५० रुपये तर सरासरी ७३५० रुपये प्रति क्विंटल, वरोरा (यवतमाळ) बाजार समितीत आज ७७७ क्विंटल आवक झाली असून, कमाल ७७०१ रुपये ते किमान ६००० रुपये तर सरासरी ७००० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला आहे. वरोरा-खांबाडा (चंद्रपूर) बाजार समितीत आज २२१ क्विंटल आवक झाली असून, कमाल ७६५० रुपये ते किमान ६५०० रुपये तर सरासरी ७००० रुपये प्रति क्विंटल, अमरावती बाजार समितीत आज ५५ क्विंटल आवक झाली असून, कमाल ७५०० रुपये ते किमान ७००० रुपये तर सरासरी ७२५० रुपये प्रति क्विंटल, पारशिवनी बाजार समितीत आज ६७६ क्विंटल आवक झाली असून, कमाल ७२७५ रुपये ते किमान ६८५० रुपये तर सरासरी ७१५० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला आहे.

दरम्यान, यंदा संपूर्ण हंगामात कापसाचे भाव हे हमीभावापेक्षा कमी राहिले. फेब्रुवारी महिन्याच्या मध्यावधीत कापसाचे भाव हळूहळू वाढण्यास सुरुवात झाली. त्यानंतर भाव ८३०० ते ८५०० या पातळीपर्यंत पोहचले. मात्र, सध्याच्या घडीला कापूस दर पुन्हा माघारी फिरले असून, सध्या कापसाला ८ हजाराच्या आत दर मिळत आहे. अर्थात केवळ दीड महिना कापसाचे भाव वाढलेले पाहायला मिळाले. मात्र, त्याआधीच अनेक शेतकऱ्यांनी आपला कापूस विक्री केलेला होता. ज्यामुळे शेतकऱ्यांना या भाववाढीचा फायदा झालाच नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

# पपईवरील बुरशीजन्य रोगांवर एकात्मिक नियंत्रण उपाय

पपई हे उष्णकटिबंधीय हवामानात मोठ्या प्रमाणावर पिकवले जाणारे सर्वात स्वादिष्ट फळ आहे. या फळाची त्वचा अतिशय पातळ असते त्यामुळे अयोग्य हाताळणीमुळे हे पीक बुरशी आणि बॅक्टेरियामुळे विविध रोगांना बळी पडते. जाणून घेऊ या पपईवरील बुरशीजन्य रोग आणि त्यावर नियंत्रण उपाय.

करपा/अँथ्रॅक्नोज : या रोगाचा प्रसार प्रादुर्भावीत फळे, वारा, पावसाचे पाणी यामुळे होतो. या रोगाची सुरुवात हिरव्या, न पिकलेल्या फळांवर लहान चट्टे स्वरुपात होते. व नंतर मोठ्या फळांवर होते. या बुरशीजन्य रोगामुळे पिकलेली फळे सडतात, फळांच्या पृष्ठभागावर गोलाकार, तपकिरी, सपाट किंवा खोलगट चट्टे पडतात.

नियंत्रण उपाय : हिवाळयात दक्षिणेकडील सूर्य किरणांचे चटके बसून या रोगाचा प्रादुर्भाव होतो. फळे मऊ बनतात. म्हणून फळे तपकिरी रंगाच्या कागदाने झाकावीत किंवा फळाभोवती पॉलिथीन कागद गुंडाळावा. रोगाची बाधा झालेली फळे व पानांचे देठ काढून टाकावेत. ४५ दिवसांच्या अंतराने कार्बेन्डाझिम ०.१% फवारणी किंवा क्लोरोथॅलोनिल ०.२% १० ते १५ दिवसांच्या अंतराने किंवा १० दिवसांच्या अंतराने थायोफेनेट-मिथाइल ०.१% किंवा मॅन्कोझेब ०.२% प्रति लिटर पाणी फवारणी या रोगाचे नियंत्रण करतात. बेझिलिसो थियोसाइनेटची धूरी काढणीनंतरचे ठिपके आणि कुजणे नियंत्रित करते.

पायकूज किंवा बुंधा सडणे : हा बुरशीजन्य रोग ऑगस्ट, सप्टेंबर, आणि फेब्रुवारी, मार्च, एप्रिल या महिन्यांत आढळतो. विशेषतः पाण्याचा चांगला निचरा न होणार्या जमिनीतील झाडांवर आढळतो. जमिनीच्या पृष्ठभागालगत झाडाच्या बुंध्याच्या सालीवर पाणी शोषलेले



चट्टे दिसतात. झाडाच्या शेंड्यावरील पाने खाली वाकतात, सुकतात, पिवळी पडतात आणि अकाली गळून पडतात

नियंत्रण उपाय : लागवडीपूर्वी रोपवाटिका उन्हात चांगली तापू द्यावी. ३ ग्रॅम थायरम प्रति किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. रोपे लावणीच्या वेळी २०० ग्रॅम शेणखतात ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा मिसळावी. पाण्याचा निचरा होण्यासाठी चर खोदावे, झाडाला दुहेरी बांगडी पद्धतीने पाणी द्यावे. शेतात खोल आंतरमशागत करू नये, झाडाच्या बुंध्याभोवती मातीची भर घालावी. रोगाची बाधा झालेल्या खोडावरील भाग खरडून काढून तेथे बोर्डो पेस्ट लावावी. १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा १ लिटर पाण्यात २ ग्रॅम कॉपर ऑक्सीफ्लोराईड मिसळून त्या द्रावणाची झाडाच्या बुंध्याजवळ फवारणी करावी. क्लोरोथॅलोनील किंवा मेटॅलॅक्झोन २ ग्रॅम/लिटर पाणी रोगग्रस्त झाडाच्या बुडाशी ओतावे.

काळे ठिपके : हा रोग सरकोस्पोरा या बुरशीमुळे होतो. पानांवर करड्या तपकिरी रंगाचे ठिपके पडतात. जास्त संक्रमण असल्यास पपईची रोगग्रस्त पाने पिवळी पडतात व सुकतात, फळांवर देखील ठिपके दिसतात.

नियंत्रण उपाय : ठिपके दिसून येताच डायथेन एम ४५, किंवा कॅप्टन, किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा कॉपर हायड्रॉक्साईड यापैकी एकाची २ ग्रॅम/लिटर प्रति लिटर पाणी याप्रमाणे १० दिवसांच्या अंतराने दोन वेळेस फवारणी घ्यावी.

भुरी : या बुरशीजन्य रोगाचा प्रसार कमी तापमान व जात दमटपणा यामुळे होतो. बुरशी पानांच्या खालील बाजूस वाढते. पानांच्या खालील बाजूस पांढ-या रंगाची भुकटी दिसून येते. प्रारंभिक अवस्थेत पानांच्या वरील बाजूने पिवळसर किंवा हलक्या हिरव्या रंगाचे ठिपके दिसून येतात. प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्यास खोडावर देखिल पांढ-या रंगाची बुरशी दिसून येते.

नियंत्रण उपाय : रोग प्रतिबंधक बियाण्यांचा वापर करावा. रोप लागवड करताना रोपात जास्त अंतर ठेवावे. रोपांना सकाळी लवकर पाणी द्यावे, पाणी मुळांशी द्यावे. संतुलित प्रमाणात खत द्यावे, नत्रयुक्त खताचा कमी वापर करावा. ५०० लिटर पाण्यात २ किलो पाण्यात मिसळणारे गंधक मिसळून द्रावणाची १५ दिवसांच्या अंतराने पानावर फवारणी करावी. कार्बेन्डाझिम ०.१% किंवा थिओफेनेट-मिथाइल ०.१% प्रति लिटर यांची एक महिन्याच्या अंतराने फवारणी प्रभावी ठरते.

# सेंद्रिय शेतीतील जैविक कीड व रोग व्यवस्थापन

''जिवो जिवोस्य जीवनम्'' म्हणजे एक जीव दुसऱ्या जीवावर जगतो. निसर्गामध्ये वावरणारे जीवजंतू हे सुद्धा एक दुसऱ्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे ते आपल्या भक्ष्याच्या शोधात असतात व त्यामुळेच निसर्गाचे संतुलन साधले जाते. सेंद्रिय शेतीमध्ये नेमका याच तत्वाचा उपयोग करून काही प्रमाणात कीड, रोग व खत व्यवस्थापन करता येते. आपण उन्हाळ्यात नांगरणी करतो. त्यामुळे बऱ्याच किडी ज्यांच्या काही अवस्था जमिनीत असतात त्यांचे उन्हाळ्यातील तीव्र उष्णतेमुळे नियंत्रण करता येते.

काही बुरशीजन्य कीटकनाशके अत्यंत प्रभावी आढळून आले आहेत. ज्यामध्ये मेटॅरायझियम ॲनिसोप्ली, बेव्हेरीया बॅसियाना, नोमोरिया रिली, व्हरटीसिलीयम लेक्यानी, पॅसिलोमायसीस लील्यासिनस या बुरशींचा समावेश होतो, तर जिवाणूजन्य कीटकनाशकामध्ये बॅसीलस थुरोंजेनीसीस तर एच. एन. पी. व्ही. हा विषाणू कीड नियंत्रणात उपयोगात येत आहे. मेटॅरायझियम या बुरशीमुळे मावा, तुडतुडे, पांढरी माशी, फुलकिडे, हुमनी, बोंडअळी, खोडकिडा (ज्वारी) तर बेव्हेरीया या बुरशीमुळे मावा, ज्वारीवरील खोडकिडा, भातावरील काटेरी भुंगा, बोंडअळी, तुडतुडे, तंबाखुची पाने खाणारी अळी, नोमोरिया या बुरशीमुळे पतंगवर्गीय कीटक जसे बोंडअळी, उंटअळी तर व्हरटीसिलीयम लेक्यानी या बुरशीमुळे मावा, पांढरी माशी, फुलकिडे, कोळी आणि पॅसिलोमायसीस लील्यासिनस या बुरशीमुळे मुख्यत: पान व केळी पिकांवरील सुत्रकृमींचा बंदोबस्त करता येतो.

बुरशीजन्य कीटकनाशके फवारणी केल्यानंतर



तोंडावाटे किंवा किडींच्या शरीरावाटे प्रवेश करून शरीरातजाळे तयार करून वाढत जाते, त्यामुळे किडींची वाढ खुंटते व अन्न खाणे बंद होते. किडीचे उच्चाटण झाल्यावर बीजाणूची पैदास होते व हेच बीजाणू नंतर दुसऱ्या किडीवर प्रादुर्भाव करतात. किडींप्रमाणे रोगनियंत्रण करण्यासाठी सुद्धा काही सुक्ष्म जिवांचा वापर करता येतो, त्यामध्ये प्रामुख्याने ट्रायकोडर्मा, बॅसीलस, सुडोमोनस, ॲस्परजिलस या सुक्ष्म जिवांचा अंतर्भाव होतो. मुख्यत: या सर्व सुक्ष्म जिवांचा वापर बिजप्रक्रिया करून त्याद्वारे बियांपासून व जमिनीतून पसरणाऱ्या रोगांचे नियंत्रण करण्यासाठी होतो. त्यामध्ये रायझोकटोनिया द्वारे होणारी मुळसड, पिथियम द्वारे होणारे रोप कोलमडणे, फ्युजारीयम द्वारा होणारा मर रोग, स्क्लेरोशियम बुरशीमुळे होणारी कुज याचा प्रामुख्याने समावेश करता येईल परंतु आता या सुक्ष्म जिवाबाबत अधिक संशोधन होऊन बियांपासून पसरणारे मुळांना होणाऱ्या रोगांचाच नव्हे तर पिकांच्या इतर भागावर येणाऱ्या रोगांना अटकाव करण्यासाठी सुद्धा अश्या बुरशी अथवा जीवाणूचा वापर होत आहे त्यात प्रामुख्याने कपाशीवरील जीवाणू करपा या रोगाचा अटकाव सुडोमोनस या उपयोगी जीवाणूद्वारे करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे इतर ही पानावरील ठिपके या रोगाचे व्यवस्थापनासाठी या जीवाणूचा प्रभावीपणे वापर होत आहे. तसेच ॲम्पेलोमायसेस क्विसकॅलिस बुरशीचा वापर भुरी (पावडरी मिल्ड्यु) रोगाच्या नियंत्रणासाठी केला जातो.

इतकेच नव्हे तर काही सुक्ष्म जिवांचा उपयोग पिकांना अन्नद्रव्यांचा पुरवठा करण्यासाठी होतो व त्यामुळे अनेक मुलद्रव्यांचा योग्य पुरवठा करता येतो. त्यामध्ये मुख्यत: रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर, ॲझोस्पायरीलम, स्फुरद विघटन करणारे सुक्ष्म जीव, निळे हिरवे शेवाळ यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. रायझोबियम या जीवाणूची बिजप्रक्रीया शेंगवर्गीय पिकांना, नत्रपुरवठा करण्यासाठी होतो. परंतु एकच रायझोबियम सर्व पिकांना चालत नाही त्याचे सात गट आहेत.

१) चवळी गट - चवळी, भुईमुंग, तूर, मुंग, मटकी, उडीद, गवार, वाल इत्यादी. २)वाटणा गट - वाटणा. ३)हरभरा गट - हरभरा. ४)घेवडा गट - घेवडा व राजमा. ५)सोयाबीन - सोयाबीन. ६)अल्फा अल्फा - ल्युसर्न गवत. ७)बरसीम - बरसीम ॲझोटोबॅक्टर या जीवाणूची बिजप्रक्रीया एकदल पिकासाठी करण्यात येते. उदा. गहू, ज्वारी, मका, बाजरी, त्याचप्रमाणे फळझाडे व फुलझाडे यासाठी सुद्धा याचा वापर करता येतो. साधारणत: जैविकांची बिजप्रक्रीया २० ते २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात करावी व स्टीकर म्हणून गुळाचे द्रावण वापरावे, या जैविकांमुळे आपल्याला जवळपास २० टक्के पर्यंत उत्पादनात वाढ मिळते परंतु जैविक उत्पादने वापरतांना. जैविक खत/किटकनाशक, बुरशीनाशक गुणवत्ता योग्य असणे गरजेच आहे त्याला सधारणत: उत्पादन केल्यापासून ६ महिन्याचा कालावधी असतो, त्या कालावधीत त्याचा वापर होणे गरजेचे असते. फवारणी तीव्र उन्हात करु नये, ह्यात जैविक घटक असल्याने फवारणीसाठी वातावरण पोषक असणे गरजेचे आहे.

फायदे : मित्र कीड किंवा मित्र बुरशीचा नाश होत नाही. फळे व भाजीपाला यावर विषारी घटक राहत नाही. परदेशी बाजारपेठ मिळते. किडीमध्ये प्रतिकारक शक्ती तयार होत नाही. पिकांत वावरणाऱ्या पक्ष्यांवर विपरीत परिणाम होत नाही.




### जागतिक दिवस: 'जागतिक कोंकणी भाषा दिन'

#### महत्वाच्या घटना

१६६९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपल्या सैनिकांना हिंदुची सर्व धार्मिक स्थळे, मंदिर, शाळा उध्वस्त करण्यास सांगितले.
१८६० : फ्रेंच देशातील प्रकाशक, पुस्तक विक्रेता आणि शोधक एडुअर्ड-लिओन स्कॉट डी मार्टिनविले यांनी सर्वप्रथम मानवी आवाजाचे ध्वनीमुद्रण केलं.
१८६७ : रशियाकडून अलास्का हा प्रांत खरेदी करण्याच्या प्रस्तावास अमेरिकेत 'एक' मताने मंजुरी मिळाली.
१९४० : दुसरे महायुद्ध : जर्मनीने नॉर्वे व डेन्मार्क पादाक्रांत केले.
१९५३ : वॉर्नर बंधूंचा पहिला त्रिमितीय (३ ) चित्रपट, हाऊस ऑफ वॅक्स, प्रदर्शित झाला.
१९६७ : बोइंग-७६७ ने पहिले उड्डाण केले.
१९९४ : सूक्ष्मजीवशास्त्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल शास्त्रज्ञ पी. एम. भार्गव यांना 'आर. डी. बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान
१९९५ : लता मंगेशकर यांना उत्तर प्रदेशचे राज्यपाल मोतीलाल व्होरा यांच्या हस्ते 'अवधरत्न' व साहू सूरसम्मान' या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.
२००३ : इराक देशातील लोकांना सद्दाम हुसेन यांच्या तानशाही पासून मुक्ती मिळाली.
२००५ : प्रिन्स चार्ल्सचा कॅमिला पार्कर-बोल्सशी विवाह संपन्न.
२०११ : प्रख्यात भारतीय समाजसेवक अण्णा हजारे दिल्ली येथे लोकपाल बील कायदा पास करण्यासठी करीत असलेले आमरण उपोषण सरकारने आपली मागणी मान्य केल्यानंतर बंद केले.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३३६ : तैमूरलंग मंगोल सरदार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १४०५)
१७७० : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ थॉमस योहान सीबेक यांचा जन्म.
१८२८ : गणेश वासुदेव जोशी उर्फ 'सार्वजनिक काका' समाजसुधारक, राष्ट्रवादी विचारसरणीचे व स्वदेशी चळवळीचे प्रणेते आणि पुणे सार्वजनिक सभेचे संस्थापक (मृत्यू: २५ जुलै १८८०)
१८८७ : विष्णू गंगाधर तथा 'दादासाहेब' केतकर पुणे विद्यार्थी गृहाचे एक संस्थापक (मृत्यू: १९ आक्टोबर १९५०)
१८९३ : राहूल सांकृतायन इतिहासकार (मृत्यू: १४ एप्रिल १९६३)
१९२५ : लिंडा गुडमन अमेरिकन ज्योतिषी व लेखिका (मृत्यू: २१ आक्टोबर १९९५)
१९२९ : भारतीय पद्मभूषण, पद्मश्री, संगीत-नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित शरण राणी यांचा जन्मदिन.
१९३० : अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ एफ. अल्बर्ट कॉटन यांचा जन्म. १९४८: जया भादुरी अभिनेत्री

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

५८५ : ५८५ इ.स. पूर्व : जपानचा पहिला सम्राट सम्राट जिम्मू यांचे निधन. (जन्म: १३ फेब्रुवारी इ. स. पूर्व ७११)
१६२६ : सर फ्रॅन्सिस बेकन इंग्लिश तत्त्ववेत्ते व मुत्सद्दी (जन्म: २२ जानेवारी १५६१)
१६९५ : वैशाख शु. ६ शके १६१७ पंडितकवी वामनपंडित यांनी भोगाव येथे समाधी घेतली. भर्तृहरीच्या शतकत्रयीचा अनुवाद आणि यथार्थदीपिका ही गीतेवरील टीका हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. (जन्म: ? ? १६०७)
१९०१ : भारतीय रहस्यवादी, तत्वज्ञ, विद्वान, सुधारक व जैन कवी श्रीमद श्रीरामचंद्र यांनी समाधी घेतली.
१९५२ : प्रख्यात काश्मीर खोऱ्यातील कवी महजूर यांचे निधन.
१९८१ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी दुर्गाबाई देशमुख यांचे निधन.
१९९४ : चंद्र राजेश्वर राव स्वातंत्र्यसैनिक, तेलंगणाच्या लढ्याचे प्रवर्तक, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस (जन्म: १९१४)
१९९८ : डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: २२ जून १९०८)
२००१ : बेहराम कॉन्ट्रॅक्टर ऊर्फ 'बिझी बी' पत्रकार व स्तंभलेखक, 'आफ्टरनून डिस्पॅच अँड कुरियर' या सायंदैनिकाचे संपादक (जन्म: ११ आक्टोबर १९३०)
२००१ : शंकरराव खरात दलित साहित्यिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: ११ जुलै १९२१)
२००९ : शक्ती सामंत हिन्दी व बंगाली चित्रपट दिग्दर्शक व निर्माते (जन्म: १३ जानेवारी १९२६)
२००९ : अशोकजी परांजपे गीतकार (जन्म:)

# अंडी उत्पादनासाठी स्पेनची आकर्षक 'ब्लॅक मिनोर्को' कोंबडी!

विदेशी कोंबडीच्या दिसायला सुंदर आणि उत्साही जातींमध्ये ब्लॅक मिनोर्को' कोंबडीला विशेष महत्व आहे. स्पेनच्या पश्चिम किनाऱ्यावरील एका सुंदर बेटावर आढळणारी मिनोर्को कोंबडी दिसायला फारच आकर्षक आहे. जाणून घेऊ या कोंबडीच्या जातीविषयी. या कोंबडीचा उगम स्पेनच्या मेनोर्का या भूमध्य बेटावर झाला आहे. त्यामुळे या जातीचे नाव मिनोर्को असे ठेवण्यात आले आहे. १८ व्या शतकात ब्रिटिशांनी या कोंबडीच्या जातींना दत्तक घेतले घेतलेल्या या जाती संकरित जाती निर्माण होण्यापूर्वी १०० वर्षे लोकप्रिय होत्या. ही कोंबडी एके काळी पांढरे शुभ्र मोठे अंडे घालण्यासाठी प्रसिध्द होती पण इतर जातींशी संकर केल्यामुळे तिच्यातील हा गुण नाहीसा झाला. शरीर रचना : मिनोर्का कोंबडी तिचे प्रभावशाली व्यक्तिमत्व आणि ताठ शरीर यासाठी ओळखली जाते. ही कोंबडी अभिमानी आणि दिसते. शरीराने व्हाईट लेगहार्नपेक्षा लहान असून सर्व पिसे काळेभोर असतात. चोच काळी असते, तुरा तांबडा असतो, कानाची पाळी पांढरी असून इतर कोंबड्यांपेक्षा मोठी असते. पूर्ण वाढ झालेल्या नराचे वजन २ किलो तर मादीचे १.५ किलो असते.


उत्पादन : जन्मानंतर २० आठवड्यात या कोंबड्यांना लैंगिक परिपक्वता येते. अंडी उत्पादनासाठी पाळली जाणारी ही कोंबडी वर्षभरात सरासरी २०० अंडी देते. शरीराचा मोठा आकार परंतु दुबळी शरीराची रचना यामुळे मांस उत्पादनासाठी या जाती कमी कार्यक्षम आहेत.

# आधिकाऱ्यांना मिनरल वॉटर,कर्मचाऱ्यांना जार

## सामान्य मात्र पिण्याच्या पाण्यासाठी बेजार; शांतता कमिटीच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांना विनंती







बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील प्रमुख प्रशासकीय कार्यालये उदाहरणार्थ जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, तहसिल, सामाजिक न्याय भवन, पंचायत समिती , बसस्थानक, नगरपरिषद आदि कार्यालयातील अधिकारी यांना मिनरल वाटर तर कर्मचाऱ्यांना जार द्वारे पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.मात्र सर्वसामान्य अभ्यागतांना विकतचे बाटलीबंद पाणी घेऊन आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याने सर्वसामान्य माणूस बेजार झाला असुन शासकीय कार्यालयात वाटर फिल्टर बसवुन पिण्याच्या शुद्ध पाण्याची तातडीने सोय करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांना लेखी निवेदनाद्वारे केली असुन निवेदनावर शेख युनुस,सुदाम तांदळे, राहुल नागरगोजे यांनी केली आहे.

जिल्हा नियोजन समितीतुन नाविन्यपूर्ण योजनेच्या नावाखाली कोट्यवधी रूपयांची उधळण केली जाते.याच कार्यालयात २ वर्षांपूर्वी कोटीभर रूपये खर्च करून उभारलेले शासकीय योजनांचे फलक वर्षभरातच निकामी झाले मात्र सामान्यांच्या पाण्यासाठी वाटर फिल्टर बसविण्यासाठी प्रशासनाला पाझर फुटत नाही हि लाजीरवाणी गोष्ट असुन शासकीय कार्यालयात अधिका-यांना मिनरल वाटर, कर्मचाऱ्यांना जारचे पाणी मात्र सामान्य नागरिक मात्र पिण्याच्या पाण्यासाठी बेजार अशी अवस्था असुन शासकीय विभागांची मातृसंस्था असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातच पिण्याच्या पाण्याचा ठणठणाट आहे.कार्यालयाच्या आवारात पिण्याच्या पाण्यासाठी बसविलेल्या प्लास्टिक टाक्या कोरड्याठाक पडलेल्या असुन शोभेच्या वस्तु झाल्या आहेत.

तसेच एकुण १६ विभाग असलेल्या जिल्हा परीषदेत रोज हजारो नागरिकांची वर्दळ असते.मात्र याठिकाणी देखील पिण्याच्या पाण्यासाठी यंत्रणा तर दुरच साधी टाकीही बसविण्यात आली नाही. अधिकारी यांना मिनरल वाटर आणि कर्मचाऱ्यांना जारची सोय आहे मात्र अभ्यागतांना पिण्याच्या पाण्याची सोय नाही.

जिल्ह्याचे ठिकाण असलेल्या आगार आणि विभागीय नियंत्रकाचे मुख्यालय असलेल्या बीड बसस्थानकात प्रवाशांची सध्या काहिली सुरू आहे.ऊन्हाचा चटका वाढत असुन प्रशासन नागरीकांना उष्माघातापासून वाचवण्यासाठी सतर्कतेचा इशारा देत आहे.बसस्थानकातुन दररोज हजारो प्रवासी ये जा करत असतात.प्रवाशांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे महामंडळाचे कर्तव्य आहे मात्र प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची कुठलीही सोय नाही.बसने प्रवास करणारे मध्यमवर्गीय व गरीब प्रवासी असतात.

# विठ्ठल दंदे यांच्या वतीने परळीत रोजा इफ्तार पार्टी

## माजी मंत्री सुरेश नवले यांच्यासह मुस्लिम बांधवांची मोठी उपस्थिती



परळी । प्रतिनिधी

माजी नगरसेवक विठ्ठल दंदे यांच्या वतीने मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तारचे आयोजन दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी रमजानच्या पवित्र महिन्यातील रविवार दि.७ एप्रिल रोजी श्री विठ्ठल दंदे यांच्या माणिक नगर येथील संपर्क कार्यालयात रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास माजी मंत्री प्रा सुरेश नवले यांच्यासह मुस्लिम बांधवांची मोठी उपस्थिती होती.

मुस्लिम समाजाचा पवित्र महिन्याचे औचित्य साधून माजी नगरसेवक विठ्ठल दंदे हे दरवर्षी मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करतात.सर्वधर्मिय जातीय सलोखा जोपासला जावा, समाजा-समाजामध्ये एकता आणि सामाजिक सलोख्याचा विश्वास अधिक दृढ व्हावा या उद्देशाने रोजा इफ्तार पार्टीचे विठ्ठल दंदे यांच्या वतीने आयोजन केले जाते.याचेच औचित्य साधून रविवारी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील अनेक नागरिकांनी यावेळी भोजनाचा आस्वाद घेतला.यावेळी ईदच्या पूर्वसंध्येला विठ्ठल दंदे यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.यावेळी माजी मंत्री प्रा सुरेश नवले, माजी नगरसेवक बाबुभाई मिस्कीन, शेख शरीफ, रफिक भाई कच्छी, हबीब भाई मिस्त्री, मुसु शेठ वाहजोद्दीन मुल्ला, राजाभाई गुत्तेदार, सय्यद गुत्तेदार, सलीम भाई, अब्दुल करीम साहब, ज्ञानेश्वर खर्डे, कॉंग्रेसचे शहर उपाध्यक्ष वैजनाथराव गडेकर, शिवा दंदे, किशोर दंदे, सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर खर्डे, अतुल गडेकर, दत्ता म्हाळगी यांच्यासह परळी शहर व पंचक्रोशीतील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महामानवांच्या विचारांना अनुसरुन शिक्षणातून समृद्धीकडे अभियान

## सुमारे सातशे विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य देऊन सन्मान



बीड । प्रतिनिधी

७ एप्रिल विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती ची जोरदार तयारी सुरु असून सार्वजनिक जयंती उत्सव समिती पेठ बीड च्या वतीने विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत डॉ आंबेडकरांनी तमाम भारतीयांना शिक्षणाचा मूलमंत्र दिला त्याच अनुषंगाने विद्यार्थ्यात शिक्षणाविषयी ओढ निर्माण व्हावी म्हणून ''शिक्षणातून समृद्धीकडे हे अभियान राबवण्यात येत आहे याच अभियानांतर्गत आज रोजी दुसऱ्या सत्रात जय भिम बुद्ध विहार,आंबेडकर नगर (पुर्नवसन कॉलनी) खंडेश्वरी रोड,पेठ बीड येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत शालेय साहित्य देऊन विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना अनुसरून यावर्षीचा जयंती उत्सव साजरा करण्यात येत असून आज पर्यंत सुमारे सातशे विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य देण्यात आले आहे. सार्वजनिक जयंती उत्सव समिती पेठ बीड च्या वतीने विद्यार्थ्यांचा सन्मान करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन देण्यात येत असल्याने यंदाचा जयंती उत्सव वैचारिकतेने साजरा होत असून बीड जिल्ह्यात पेठ बीड उत्सव समितीच्या कार्याचे कौतुक केले जात आहे. आधुनिक युगात शिक्षणाची चळवळ गतिमान करणे हेच खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन ठरेल. परिवर्तनाचा हा पायंडा अखंडपणे सुरू राहणार असल्याचे समिती चे संस्थापक तथा नगरसेवक ॲड विकास जोगदंड यांनी नियोजित कार्यक्रमाप्रसंगी सांगितले. या प्रसंगी आंबेडकरी चळवळीतील रणझुंजार नेतृत्व अनिलराव तुरुकमारे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक पुरस्कार मिळाल्या बद्दल पेठ बीड जयंती उत्सव समितीच्या वतीने त्यांचा हृदयपूर्ण सन्मान करण्यात आला. यावेळी भागवत बादाडे, रुस्तुम बेद्रे,मंगेश जोगदंड,मंगेश जोगदंड, सचिव गोविंद वाघमारे,उपाध्यक्ष अशोक प्रधान,सूरज वंजारे,साहिल गायकवाड,आदर्शराजे जोगदंड,आदित्यराजे जोगदंड,उज्वल कोरडे, महादेव वंजारे, अमोल शिंदे, रेखाताई गायकवाड,बचुटे ताई, बबीताताई कोरडे,सह पेठ बीड उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी विद्यार्थी उपस्थित होते.

# यंदा सीईटी प्रवेश परीक्षेशिवाय बीसीए अभ्यासक्रमात प्रवेश मिळणार नाही

बीड । प्रतिनिधी

बीसीए अभ्यासक्रमासाठी आता सीईटी प्रवेश परीक्षा बंधनकारक करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बीसीए या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत सीईटी परीक्षा घेण्यात येणार आहे. ११ एप्रिल नोंदणीची शेवटची तारीख असून विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी असे आवाहन तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीडचे प्राचार्य डॉ.एल. एम.थोरात यांच्या वतीने करण्यात आले आहे. पुढील शैक्षणिक वर्षांपासून बीसीए हा अभ्यासक्रम एआयसीटीईने आपल्या कक्षेत घेतला आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमाला सीईटी लागू करण्यात आली आहे. २१ मार्च पासून अर्ज नोंदणीला सुरुवात झाली असून, ही सीईटी परीक्षा प्रथमच महाराष्ट्रात विविध परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. सीईटी साठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ११ एप्रिल २०२४ पर्यंत देण्यात आली आहे. त्या नंतर ही तारीख कोणत्याही स्थिती मद्ये वाढणार नाही असे कळविण्यात आले आहे.

### ११ एप्रिल नोंदणीची शेवटची तारीख ; विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी

बहुतेक विद्यार्थी हे शेवटच्या क्षणी बीसीए या अभ्यासक्रमात आपला प्रवेश निश्चित करतात मात्र यावेळी जर विद्यार्थ्याने सीईटी दिलेली नसेल तर विद्यार्थी कोणत्याही महाविद्यालयात बीसीए साठी प्रवेश घेऊ शकणार नाही. तरी विद्यार्थ्यांनी विलंब न करता लवकरात लवकर सीईटी नोंदणी करून घ्यावी असे आवाहन तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीडचे प्राचार्य डॉ. एल. एम.थोरात यांनी यांनी केले आहे. विद्यार्थ्यांना सीईटी बद्दल योग्य मार्गदर्शन देण्यासाठी तुलसी महाविद्यालय बीड येथे विद्यार्थी मदत केंद्र महाविद्यालयाच्या वतीने स्थापन करण्यात आले आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.एल.एम.थोरात यांनी केले आहे.

# रमज़ानमुळे व्यक्तीला नैतिक, आध्यात्मिक प्रशिक्षण प्राप्त होते-डॉ. पारनेरकर

बीड । प्रतिनिधी

प्रसिद्ध विचारवंत, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रफीक पारनेरकर यांनी बीड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे घेण्यात आलेल्या रमज़ान परिचय व रोज़ा इफ़्तार कार्यक्रमात वरील प्रतिपादन केले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. सय्यद रफ़ीक़ पारनेरकर यांनी रमज़ान परिचय या विषयावर विशेष मार्गदर्शन करत रमज़ान, उपवासाचा उद्देश, कुरआनचा संदेश या विषयी मराठी भाषेत महत्त्वाची माहिती दिली. यावेळी ते म्हणाले की, रमज़ानचा महिना जेवढा खडतर असतो तेवढाच उपकारक असतो. या खडतर महिन्यातून मिळालेले नैतिक आणि आध्यात्मिक प्रशिक्षण श्रद्धावान व्यक्तीला इतकी ऊर्जा देते की, तो पुढील ११ महिने वाईट गोष्टींपासून स्वबळावर लांब राहू शकतो. रमज़ान आपल्या आध्यात्मिक पार्श्वभूमीच्या दृष्टीने इतर महिन्यांपेक्षा श्रेष्ठ व वेगळा आहे. या महिन्यात अल्लाहची दया आणि कृपा रोज़ा ठेवणाऱ्यांवर अखंडपणे सुरू असते. अल्लाह रमज़ान महिन्यात श्रद्धावंतांना अधिक बक्षिसे देतो व त्यांचा पश्चात्ताप मोठ्या प्रमाणात स्वीकारतो. दानधर्मामुळे रमज़ानमध्ये बंधुभाव सुद्धा वाढतो. रमज़ानचा मूळ उद्देश आहे तक़्वा. तक़्वा म्हणजे ईशभय, पापभिरुता माणसांमध्ये निर्माण करणे. तक़्वा काय आहे याविषयी हदीसमध्ये सांगितले आहे की, जेव्हा तुम्ही काटेरी रस्त्यातून चालता तेव्हा आपले कपडे कसे सांभाळून चालता तसेच या जगात वावरताना पापांपासून दूर राहण्यासाठी आपल्याला असेच सांभाळून चालावे लागेल. कार्यक्रमाच्या शेवटी दिव्य कुरआन ची मराठी आवृत्ती व इतर इस्लामी साहित्य उपस्थितांना वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बनसोडे (सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी) होते तर प्रमुख पाहुणे समीर काज़ी (सदस्य वक्फ महामंडळ महाराष्ट्र), भोले, सय्यद मोईन मास्टर, वानखेडे, राऊत, कॅप्टन राजाभाऊ आठवले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत वासनिक यांनी केले तर सूत्रसंचालन शेख अब्दुल हमीद यांनी केले. जमाअत ए इस्लामी हिंद बीड चे अध्यक्ष प्रा. जावेद अली खान, प्रा. सय्यद शफ़ीक़ हाशमी, तानाजी शिनगारे, बबन वाघमारे, सुप्रसिद्ध गायक शेख, फरीद अन्सारी, अरुणा आठवले, अनिता डोंगरे, करुणा समुद्रे, सुमेध जोगदंड, अशोक गायकवाड, दळवी, सुधीर अडाणे, लखन वडमारेसह शेकडोंच्या संख्येने सर्व धर्मीय नागरीक उपस्थित होते. हा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड, सावित्री-फातेमा सद्भावना मंच जमात ए इस्लामी हिंद, बीड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन मित्र मंडळ बीड यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. तत्पूर्वी डॉ. रफ़ीक़ पारनेरकर यांनी दिवंगत ओबीसी नेते हनुमंत उपरे यांच्या निवासस्थानी भेट देऊन संदीप उपरे यांना इस्लामी संस्कृती हे पुस्तक सप्रेम भेट दिले तर संदीप उपरे यांनी डॉ. रफ़ीक़ यांना दिवंगत हनुमंत उपरे यांनी लिहिलेले गौरव ग्रंथ हे पुस्तक सप्रेम भेट दिले.

# युसूफवडगांव येथे अखंड रामनाम सप्ताह

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे प्रतीवर्षाप्रमाणे याही वर्षी प्रभु श्री राम पुन:प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिना निमित्ताने आज गुढीपाडव्यापासुन गावामध्ये अखंड रामनाम सप्ताह व रामकथा सोहळ्यास आरंभ होत आहे.

यावर्षी रामकथा प्रवक्त्या म्हणुन सुप्रसिद्ध किर्तनकार रूपाली सवने परतुरकर याची सात दिवस रामकथा सेवा लाभणार आहे तसेच पुढील सात दिवसरोज संध्याकाळी महाराष्ट्रातील विविध ख्यातनाम प्रसिद्ध कर्तनकारांचे किर्तन असुन पहिल्या दिवशी बाल किर्तनकार श्रावणी मधुरा ओमप्रकाश हिरे कळंबकर यांचे किर्तन दुसऱ्या दिवशी इंद्रजित रसाळ महाराज यांचे किर्तन, तिसऱ्या दिवशी संस्कार खंडागळे महाराज यांचे किर्तन,चौथ्या दिवशी अभंग महाराज पठाडे यांचे किर्तन, पाचव्या दिवशी आरती भुजबळ महाराज यांचे किर्तन,सहाव्या दिवशी रविंद्र महाराज यांचे किर्तन, सातव्या दिवशी प्रतिक्षा जाधव महाराज यांचे किर्तन होईल तर आठव्या दिवशी गुरूवर्य प्रकाश महाराज बोधले यांच्या काल्याच्या किर्तनाने व महा प्रसादाने अखंड रामनाम सप्ताह्याची व रामकथा सोहळ्याची सांगता होईल तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच,उपसरपंच सर्व ग्रा.प.सदस्य व समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# एकता सारख्या सामाजिक संस्थांनी एकत्र कार्य करण्याची गरज-मनिषा घुले



शिरूर । प्रतिनिधी

शहरातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित 'एकता विभागीय कार्यकर्ता नियुक्तीपत्र प्रदान समारंभ आणि विभागीय काव्य संमेलन २०२४' हा कार्यक्रम रविवारी पार पडला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन व्यंकटेश वैष्णव यांची उपस्थिती होती.या वेळी व्यासपीठावर कालिकादेवी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे यांच्यासह शांतीवन प्रकल्पाच्या संचालिका तथा सामाजिक कार्यकर्त्या कावेरीताई नागरगोजे यांची उपस्थिती होती.एकता फाउंडेशन सारख्या सामाजिक संस्थांनी एकत्र येवून सामूहिकपणे काम करण्याची गरज असल्याचे मत कार्यक्रमाच्या उद्घाटक तथा नवचेतना सर्वांगीण विकास केंद्र, केज च्या सचिव मनिषा घुले यांनी उपस्थितांना संबोधित केले.इतर क्षेत्रांप्रमाणेच सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकता फाउंडेशन सारख्या संस्थांनी एकत्र येत काम केले तर समाज आणि राष्ट्राची प्रगती होण्यास वेळ लागणार नाही.एकता फाउंडेशनचे सर्वच सभासद मेहनत घेऊन एकताचे कार्य राज्यस्तरावर पोहचवत आहेत याचा इतरांनी नक्कीच आदर्श घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

समाजाची ढासळलेली अवस्था बघून प्रत्येकजण हळहळ व्यक्त करतो पण एकता फाउंडेशन हे उक्तीतून नाही तर प्रत्यक्ष कृतीतून विधायक कार्य करत आहे याचा तालुक्यालाच नाही तर संपूर्ण जिल्ह्याला सार्थ अभिमान असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार व्यंकटेश वैष्णव यांनी केले.शांतीवनच्या कावेरीताई यांनी शांतीवन प्रकल्प उभा करत असताना नागरगोजे दांपत्याला आलेल्या अडीअडचणींवर मात करत ऊसतोड मजूरांसह अनाथ पालकांच्या मुलांसाठी नंदनवन उभा करण्यापर्यंतचा कठीण प्रवास सभागृहासमोर मांडला.तेव्हा प्रत्येकाचे डोळे पाणावले.समाजातील विविध घटकांनी समाजासाठी एकत्र येत समाजाप्रती एकनिष्ठ राहून चालवलेले निर्हेतूक कार्य म्हणजे एकता फाउंडेशन अशा शब्दांत प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे यांनी एकताच्या कार्याचा याप्रसंगी गौरव केला.

या वेळी एकताचे सचिव गोकुळ पवार यांनी प्रास्ताविक तर संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.सहसचिव लखुळ मुळे यांनी आभार प्रदर्शन केले.यावेळी एकताचे कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर,केंद्रीय उपाध्यक्ष नितीन कैतके,सल्लागार ॲड.भाग्यश्री ढाकणे,महिला आघाडी प्रमुख रंजना फुंदे,संस्थापक सदस्या लता बडे,राज्य संघटक देवीदास शिंदे,युवक प्रदेश निमंत्रक इम्रान शेख,मराठवाडा विभागीय संघटक तथा जेष्ठ संपादक राजा पुजारी,परभणी जिल्हा सचिव भास्कर बोडखे,संघटक चंद्रकात गाडे,महानगरीय अध्यक्षा प्रा.शोभा घुंगरे,बीड जिल्हा सचिव बालासाहेब गवळी, व्यापारी आघाडीचे इंजि.संदिप ढाकणे,भागवत वारे, पो.कॉ.घनशाम केदार, युवाकवयित्री सोनाली गरड, सानिका खेडकर,आकांक्षा सोनवणे आदी पदाधिकाऱ्यांसह सभासद आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गुढीपाडवा, नववर्ष निमित्त आज बीड शहरातून स्वागत फेरी

बीड । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी हिंदू नववर्ष गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर हिंदू धर्मात नव्या वर्षाची सुरुवात गुढीपाडव्यापासून केली जाते, यंदा गुढीपाडवा मंगळवारी नऊ एप्रिल रोजी येत आहे. गुढीपाडव्याचे विविध धार्मिक महत्त्व सर्वांनाच माहित आहे. साडेतीन मुहूर्तापैकी एक महत्त्वाचा शुभ दिवस जसा आहे तसंच यावर्षी प्रभू श्रीराम जन्मभूमी अयोध्येत प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर यावर्षी वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. यानिमित्ताने श्नीशालिवाहन शके १९४६ क्रोधीनाम संवत्सरारंभ आज मंगळवार दि.९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ठिक ७ .०० वाजता मोंढ्यातील बालाजी मंदिरापासून भव्य स्वागत फेरीचे आयोजन करण्यात आले असून या फेरीचा समारोप सहयोग नगर येथील सर्वेश्वर गणेश मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे होत आहे, या स्वागत फेरीत सर्वांनी सहभाग द्यावा असे आवाहन समस्त संयोजक धर्मप्रेमी नागरिकाच्या वतीने करण्यात येत आहे.

गुढीपाडव्याला प्रभू श्रीराम वनवासातून पुन्हा आयोध्देत परत आले, यांच्या स्वागतासाठी गुढी उभारून अयोध्या सजली होती, यावर्षी पाचशे वर्षाच्या संघर्षाच्या इतिहासानंतर परत अयोध्येत प्रभूषण जन्मभूमीत प्राणप्रतिष्ठा सोहळा थाटात संपन्न झाला आहे, त्यामुळे सर्वत्र उत्साह आणि आनंदी वातावरण झालेले आहेच या पार्श्वभूमीवर यावर्षी गुढीपाडव्याला विशेष महत्त्व आणि नववर्षाचे स्वागत मोठ्या उल्हासात साजरा करण्यासाठी प्रतिवर्षाप्रमाणे प्रभात समयी स्वागत फेरीचे आयोजन केले गेले आहे. यासाठी सर्व धर्मप्रेमी संघटना संस्था नागरिकांच्या एका बैठकीत नियोजन झालेले असून सर्वांनी नववर्षाच्या स्वागतासाठी एकत्र यावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.




























This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पंकजाताई मुंडेंचा असाही साधेपणा

## श्रीक्षेत्र चाकरवाडीच्या महापंगतीत भाविकांना वाढला प्रसाद

**केज । प्रतिनिधी**

भाजपाच्या राष्ट्रीय सचिव तथा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या साधेपणाचा प्रत्यय पुन्हा एकदा दिसून आला. श्रीक्षेत्र चाकरवाडीत माऊलींचे दर्शन घेतल्यानंतर त्यांनी स्वतःच्या हाताने महापंगतीतील भाविकांना प्रसाद वाटप केला, त्यांच्या या कृतीने उपस्थित भाविक मात्र भारावून गेल्याचे पहायला मिळाले.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने पंकजाताई मुंडे यांचा सध्या जिल्हाभरात दौरा करत आहेत. आज सोमवती अमावस्यानिमित्त परळीतील व्यापाऱ्यांच्या वतीने चाकरवाडीत महापंगत ठेवण्यात आली होती. पंकजाताई मुंडे आज बीडमध्ये होत्या, प्रचारातून वेळ काढून त्या श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे पोहोचल्या. सर्वप्रथम त्यांनी संत माऊली महाराजांचे दर्शन घेतले. मंदिर संस्थानच्या वतीने महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी त्यांचं यावेळी स्वागत केलं. यानंतर पंकजाताईंनी लगेच महापंगतीत जाऊन भाविकांना स्वतःच्या हाताने प्रसाद वाटप केला, त्यांचा हा साधेपणा पाहून उपस्थित भाविक भारावून गेल्याचे पहायला मिळाले.





**माऊलींचे घेतले दर्शन ; कारेगावच्या संत बाळूमामांच्या सप्ताहात घेतला कीर्तन श्रवणाचा लाभ**

संत बाळूमामा मंदिराच्या सप्ताहास भेट

मौजे कारेगव्हाण येथे सुरु असलेल्या संत बाळूमामा मंदिर सप्ताहास पंकजाताई मुंडे यांनी आज भेट दिली. याठिकाणी व्याकरणाचार्य ह.भ.प. अर्जुन महाराज लाड गुरूजी यांच्या कीर्तन श्रवणाचाही त्यांनी लाभ घेतला तसेच उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधला.

# इन्स्पायर अवॉर्ड राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनी श्रेया कुलकर्णीची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

२०२२-२३ या शैक्षणिक वर्षी चे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन जिल्हा परिषद प्रशाला जालना येथे दिनांक ०७ व ०८ मार्च २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय, माजलगाव कु. श्रेया सारंग कुलकर्णी इयत्ता दहावी क या विद्यार्थिनीचे 'अत्याधिक वजनामुळे ट्रकचे अपघात रोखणारी संवेदक व नियंत्रण यंत्रणा' हे उपकरण इन्स्पायर अवॉर्ड स्पर्धेत राज्यस्तरास पात्र झाले आहे. मालवाहतूक करणारी वाहने यात प्रमाणापेक्षा अतिभार घेऊन रस्त्यावर वाहतूक करतात परिणामी रस्त्यांवर अपघातांचे प्रमाण प्रचंड आहे म्हणूनच वाहनांमध्ये भार नियंत्रक म्हणून लोडिंग सेंसर सेल व इतर सेंसर च्या मदतीने वाहनात अतिभार लोड केल्यास वाहन रेड लाईट व बझर साऊंड करते तसेच जोपर्यंत अतिभार कमी केल्या जात नाही वाहन इंजिन चालू होत नाही असे उपकरण तयार करण्यात आले. असे उपकरण प्रत्येक लोडिंग वाहनात कार्यरत केल्यास वाहनातील भारमालाचे वजनही डिस्प्ले स्क्रीनवर दाखवते वाहतूक व दळण व्यवस्थेत असे उपकरण नक्कीच खूप फायदेशीर ठरेल.




या स्पर्धेकरिता उपकरण निर्मितीस व श्रेयाचे मार्गदर्शक म्हणून अटल टिंकरिंग लॅब प्रमुख श्री चेतन धुरंधरे सर, श्री नितीन सोनवणे सर, श्रेयाचे पालक डॉ.श्री.सारंग कुलकर्णी सर व श्री सिद्धेश्वर अटल टिंकरिंग लॅब यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या सर्वांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले सर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने कार्यालय प्रमुख संतोष लवडकर यांनी अभिनंदन केले आहे.

# प्राध्यापक मनोज पवार यांच्या वतीने अंमळनेर येथे इफ्तार पार्टी संपन्न

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

अंमळनेर येथिल लोकमान्य नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. मनोज पवार यांच्या वतीने अंमळनेर येथे दिनांक ७ एप्रिल २०२४ रविवार रोजी ग्रामपंचायतच्या प्रांगणात इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. मुस्लिम समाजातील पवित्र रमजान महिन्यातील रमजान ईद हा सण मोठा मानला जातो. हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन इफ्तार पार्टीतून होते. यावेळी मुस्लिम बांधवांना पवित्र रमजानच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शफिक शेठ इनामदार, रफिक तांबोळी, आमिन सय्यद, अनुभाई सय्यद, शौकत बागवान, सत्तार आतार, अहमद पठाण, शब्बीर बागवान, तोफिक बागवान, पिरमहंमद शेख, इब्राहिम शेख, मुबारक शेख, समीर बागवान, फिरोज बागवान, तसेच ग्रा.प. सदस्य प्रल्हाद पोकळे, आप्पासाहेब कांबळे, विठ्ठल मिसाळ, पत्रकार बबन उकांडे, भाऊसाहेब पवार तसेच अभिमन्यू पात्रुडकर, अनिल हाडतगुणे, गणेश वरपे, महेश हाडतगुणे सर, भागवत नवले, हरी पवार, भारत पवार, प्रशांत पवार, रितेश पवार, विठ्ठल नवले, सतिष मधूकर मिसाळ आदी सह हिंदू मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# वंचितांना आत्मनिर्भर करण्यासाठी पुढाकार घ्या - स्वाती हेरकल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

वंचितांना आत्मनिर्भर करण्यासाठी परिवर्तन घडविणारे प्रकल्प राबविले पाहिजेत. या माध्यमातून श्वास्वत विकास झाल्यानंतर ग्रामिण भागाचे आरोग्य, आर्थिक, उन्नती, स्वच्छ व सुंदर हरित गाव ही गाव समृद्ध करणारी योजना राबवून ग्रामिण भागाला आत्मनिर्भर करण्यासाठी रोटरीने पुढाकार घेतला आहे. असे प्रतिपादन रोटरीच्या प्रांतपाल स्वाती हेरकल यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वार्षिक कामाचा आढावा घेण्यासाठी प्रांतपाल स्वाती हेरकल अंबाजोगाईत आल्या होत्या. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर रोटरीचे सहप्रांतपाल गणेश वाघ रोटरी क्लबचे अध्यक्ष स्वप्नील परदेशी, सचिव गणेश राऊत, रोटरीचे सल्लागार, संतोष मोहिते, भावी अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी यांची उपस्थित होती.




यावेळी बोलताना डॉ.स्वाती हेरकल म्हणाल्या की, अंबाजोगाई शहराने रोटरीच्या माध्यमातून आपले अस्थित्व आधुरेखील केले आहे. वंचितांना आत्मनिर्भर करण्यासाठी रोटरीचा मोठा पुढाकार आहे. रोटरीच्या माध्यमातून स्नेह व आत्मियतेने सुरू असलेले काम समाजाला दिशा दर्शक ठरते असे सांगुन त्यांनी विविध प्रकल्पांची माहिती दिली.यावेळी सेंद्रिय शेती करण्यासाठी कंपोस्ट खत निर्मिती संचाचे वाटप जोगाईवाडी , मांडवा व हिवरा येथील ग्रामस्थांना करण्यात आले. तर स्व.बलरामजी परदेशी यांच्या स्मरणार्थ स्वप्नील परदेशी यांच्या वतीने दोन गरजू महिलांना शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. रोटरी क्लब व कॉम्प्युटर वर्ल्ड यांच्या वतीने भारज येथील ज्ञानसागर कर्णबधिर विद्यालयाला तीन संगणक संच भेट म्हणून देण्यात आले. यावेळी सामाजिक आधार माणुसकीचे अध्यक्ष अॅड.संतोष पवार व वैद्यकीय क्षेत्रात काम करणारे डॉ.इम्रान अली सय्यद यांना रोटरी होकेश्नल अवॉर्ड देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी क्युवर इंडिया या संस्थेस जन्मताच बाळाचे पाय वाकडे असणार्या बालाकांच्या उपचारासाठी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी पॉल हरीस फेलो मानांकणासाठी डॉ.नवनाथ घुगे, डॉ.निशिकांत पाचेगावकर, आनंद कर्नावट, स्वप्नील परदेशी, संतोष मोहिते, कल्याण काळे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वप्नील परदेशी यांनी केले. संचलन स्वरूपा कुलकर्णी यांनी तर उपस्थितांचे आभार गणेश राऊत यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# कायद्याच्या शुद्ध अंमलबजावणी मुळे नागरिकांना सन्मानाने जगण्याची संधी मिळते –ॲड.कल्याणी विर्धे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कायद्याच्या शुद्ध अंबलजवणीमुळे नागरिकांना सन्मानाने जगण्याची संधी मिळते असे मत ऍड कल्याणी विर्धे यांनी व्यक्त केले. त्या अंबाजोगाई शहरातील मानवलोक समाजकार्य महाविद्यालयामध्ये डॉ शैला लोहिया यांच्या जयंतीच्या निमित्ताने एक दिवशीय कायदेविषयक कार्यशाळा घेण्यात आली त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ऍड कल्याणी विर्धे बोलत होत्या. अंबाजोगाई शहराच्या सुप्रसिद्ध साहित्यिका तथा समाजसेविका डॉ शैला लोहिया यांच्या जयंतीनिमित्त शनिवार दि ६ एप्रिल २०२४ रोजी मानवलोक समाजकार्य महाविद्यालयात एक दिवशीय कायदे विषयक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती . या कार्यशाळेमध्ये महिलांच्या संदर्भाने विविध कायदे व त्यावर चर्चा घेण्यात आली. आज समाज आधुनिकते कडे चालला असताना देखील आजही महिलांचे अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी विविध कायदे तयार झाले आहेत या कायद्यांचे विश्लेषण ऍड कल्याणी विर्धे यांनी अत्यंत समर्पक पद्धतीने केले. प्रत्येक कायदा समजावून सांगताना त्या पाठीमागील पार्श्वभूमी, स्त्रियांच्या संघटनांनी घेतलेले परिश्रम आणि जनतेचा आवाज यातून हे सर्व कायदे तयार होण्यास योग्य असे वातावरण निर्माण झाले असे त्यांनी याप्रसंगी सांगितले. विवाह, कौटुंबिक हिंसा , बलात्कार , कामाच्या ठिकाणी महिलांचा छळ, लहान मुलांवरील लैंगिक अत्याचार, दत्तक विधान आणि मालमत्तेतील अधिकार या कायद्या विषयी अत्यंत विश्लेषण पूर्वक चर्चा करण्यात आली.




आयोजित या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉक्टर अरुंधती पाटील यांनी केले तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर प्रकाश जाधव हे उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये समाजकार्य महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक यांची उपस्थिती होती. कार्यशाळा ही संवादात्मक पद्धतीने झाल्यामुळे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केले आणि त्यावर अत्यंत समर्पक पणे त्या प्रश्नांची उकल देखील ऍड विर्धे यांनी यावेळी केली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मानवलोक समाजकार्याचे सर्व प्राध्यापक , विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मोतीलाल कोठारी विद्यालयाच्या वतीने मतदान जनजागृती विशेष मोहिमेचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा निवडणूक कार्यालय आणि स्वीप समितीच्या वतीने जिल्ह्यातील विविध शाळांना मतदान जनजागृती विशेष मोहीम घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याचं अनुषंगाने कडा येथे मोतीलाल कोठारी विद्यालयाच्या वतीने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

देशामध्ये होत असलेला लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदानाचा टक्का वाढावा यासाठी स्वीप अंतर्गत मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून कडा येथील मोतीलाल कोठारी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गावातून मतदान रॅली काढली. तसेच पथनाट्य सादर करण्यात आले. या उपक्रमात शालेय विद्यार्थी सहभागी झाले होते. या मतदान जनजागृती अभियानामध्ये आज विद्यार्थ्यांनी जनजागृती करणारे फलक हाती घेऊन केलेल्या मानवी साखळी करत गावात फेरी काढली. या अभियानात विद्यालयाचे मुख्याध्यापक एम इ शिकारे, उपमुख्याध्यापक प्रकाश सरडे, शिक्षक संजय नाथ, शैलेश खाडे, रंजना जोशी,अनिल पोखरणा, भीमाशंकर मराठे ,एम बी सातपुते यांच्यासह शिक्षक सहभागी झाले होते.

# अपयशानंतरच यशाची सुरूवात होते - प्रा.संतोष मोहिते




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

जो व्यक्ती आयुष्यात यशस्वी होतो त्या व्यक्तीच्या मागे अनेक अयशस्वी वर्षे असतात त्यामुळे आयुष्यात कोणतीही समस्या तुमच्या धैर्यापेक्षा मोठी नाही असे प्रतिपादन आंतर भारतीचे समन्वयक प्रा.संतोष मोहिते यांनी केले.

आंतरभारती अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित मेरी बात या कार्यक्रमात संतोष मोहिते उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी त्यांनी आपण कसे घडलो, हे उपस्थितांसमोर सांगताना अनेक यश अपयशाचे दाखले दिले. समाजात काम करत असताना नकारात्मकता न बाळगुण सामोरे जाण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. सकारात्मक दृष्टीकोणच आयुष्यात तुम्हाला पुढे घेवून जातो. आपण रोटरी क्लब, आंतर भारती व विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून काम करत असल्याचे त्यांनी सांगितले. शहरात गरीब विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख निर्माण करून देवून त्यांच्या अंगी असलेल्या गुणांना वाव देण्यासाठी व रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे मोहिते म्हणाले. यावेळी आंतरभारतीचे राष्ट्रीय सचिव अमर हबीब व मान्यवरांच्या हस्ते मोहिते यांचा सन्मान करण्यात आला.

# खडतर परिश्रमाशिवाय यश नाही –लेफ्टनंट अभिषेक उपेंद्र कुलकर्णी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

इयत्ता दहावी आणि बारावीनंतर विद्यार्थ्यांना सैन्यदल किंवा सीमा सुरक्षा दल किंवा नेव्ही, बी.एस.एफ.,एनडीए इत्यादी क्षेत्रांमध्ये जर जायचे असेल तर खडतर परिश्रमाला अन्य दुसरा कुठला पर्याय नाही, त्याशिवाय यश मिळणार नाही,'' असे प्रतिपादन लेफ्टनंट अभिषेक कुलकर्णी यांनी केले.ते खोलेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्रसेना विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या भारतीय सैन्य दल भरती/ प्रवेश यासंदर्भातील मार्गदर्शनपर कार्यक्रमात बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी होते

तर मंचावर उपप्राचार्य प्रा.डॉ. दिगंबर मुडेगावकर,प्रा. रवींद्र कुंबेफळकर, एनसीसीचे कॅप्टन सुंदर खडके, लेफ्टनंट अभिषेक कुलकर्णी यांची आई सौ.मंगला कुलकर्णी,वडील उपेंद्र कुलकर्णी आदी उपस्थित होते.

याप्रसंगी लेफ्टनंट अभिषेक कुलकर्णी यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी सन्मान चिन्ह,ग्रंथ देऊन सन्मान केला.




पुढे बोलताना लेफ्टनंट अभिषेक कुलकर्णी यांनी आपल्या मार्गदर्शनात इयत्ता दहावी व बारावीनंतर सैन्यदलात असलेल्या विविध परीक्षा,त्यांची तयारी व त्यात असलेल्या संधींची माहिती सविस्तरपणे विद्यार्थ्यांना करून दिली. सैन्य दलामध्ये तसेच एनडीए, बॉर्डर सिक्युरिटी फोर्स, सीआरपीएफ, कम्बाईन डिफेन्स अकॅडमी, आर्मी, नेव्ही व कोस्ट गार्ड यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी कोणकोणत्या परीक्षा दिल्या पाहिजेत व त्यासाठी ची तयारी कशा पद्धतीने केली पाहिजे यासंबंधी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना एनसीसी मध्ये प्रवेश घ्या, त्यातील सी- सर्टिफिकेटची परीक्षा ही अत्यंत महत्त्वाची असल्याचे देखील त्यांनी याप्रसंगी सांगितले. तसेच या परीक्षांची तयारी करत असताना इयत्ता बारावी पर्यंतचे इंग्रजी व गणित या विषयांचे बेसिक कन्सेप्ट यांची तयारी चांगली असली पाहिजे असेही त्यांनी सांगितले.जीवनात कुठलाही एखादा खेळ खेळा, त्याची आवड जोपासा, जिमला जा, नियमितपणे व्यायाम करा, त्यामुळेच तुमचे व्यक्तिमत्व व चरित्र विकसित होत असते, म्हणून कठोर मेहनत आणि ज्ञान सैन्य दलात नोकरी करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. आपल्या प्रमुख मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून विद्यार्थ्यांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची त्यांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून उत्तरे दिली.अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी लेफ्ट.अभिषेक कुलकर्णी यास जे यश प्राप्त झाले आहे त्या यशामागे त्याची प्रचंड मेहनत, जिद्द व परिश्रम आहेत या सैन्य दलाच्या विविध क्षेत्रांच्या माध्यमातून देश सेवा करण्याची खूप मोठी संधी विद्यार्थ्यांना आहे, मात्र त्यासाठी योग्य त्या मार्गाचा अवलंब करून त्या दिशेने यशस्वी वाटचाल केली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅप्टन सुंदर खडके यांनी केले. या वेळी छात्रांनी एन.सी.सी. गीत सामुहिकपणे गायले गेले. कार्यक्रमाचे संचालन प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी यांनी उपस्थितांचे आभार प्रा. जीजाराम कावळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पत्रकार मधुसूदन कुलकर्णी (मुडेगावकर) यांच्यासह अनेक एनसीसी कॅडेट्स व इयत्ता अकरावीचे विद्यार्थी- विद्यार्थिनी, प्राध्यापक बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीरनामा

धारूर येथील श्रीमती नुतन सचिन कदम सह दिवाणी न्यायधीश
क.स्तर धारूर
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १२४/२०२४
राजुबाई व इतर वि निरंक

मयताचे नाव राणबा पिता ग्यानबा लोखंडे रा. साठे नगर धारूर ता धारूर जि. बीड हे दिनांक २६/०३/१९९३ रोजी मयत झाले आहेत. आणि त्यांचे वारस अर्जदार १. राजुबाई भ्र. राणबा लोखंडे रा. साठे नगर धारूर ता धारूर जि. बीड २. बब्रुवान पिता राणबा लोखंडे रा. साठे नगर धारूर ता धारूर जि. बीड ३. रामकिसन राणबा लोखंडे रा. साठे नगर धारूर ता धारूर जि. बीड यांनी या न्यायालयास मयत राणबा पिता ग्यानबा लोखंडे रा. साठे नगर धारूर ता धारूर जि. बीड हे मयत झाले असून त्यांच्या पश्च्यात अर्जदारस शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी व इतर महत्वाच्या काम करिता अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालया कडे केला आहे. त्या पेक्षा अर्जदार सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हे असे समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्यांच्या हककाबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत **राणबा पिता ग्यानबा लोखंडे रा. साठे नगर धारूर ता धारूर जि. बीड** यांच्या वारसाना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८/०४/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिकयानिशी दिले.

पुढील तारीख १०/०५/२०२४

**धपाटे व्ही.व्ही.**
**क. लिपिक**

**बी.जी.चाटे सहायक**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क–स्तर धारूर**

## जाहीरनामा

धारूर येथील श्रीमती ए.बी.जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायधीश
क–स्तर धारूर
किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ११९/२०२४
रंजनाबाई व इतर वि निरंक

प्रस्तुतच्या अर्जात अर्जदार यांनी मयत अशोक पिता रामचंद्र सोळके रा मोहखेड ता.धारूर जि. बीड हे दिनांक ०५/०७/२०२३ रोजी मयत झाल्याचे नमूद केले आहे.

त्यांच्या पश्च्यात अर्जदार १. रंजनाबाई भ्र.अशोक सोळंके रा मोहखेड ता धारूर जि. बीड २. संतोष पिता अशोक सोळके रा. मोहखेड ता धारूर जि. बीड ३. शीतल भ्र.वचीष्ट मोकाशे रा कानेगाव ता सोनपेठ जि. परभणी ४. राधा भ.संजय सोमवंशी रा धानोरा ता आंबेजोगाई जि. बीड सदर यांनी अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी व अर्जदार क्र. २ हा मुलगा व अर्जदार क ३ व ४ या मयताच्या मुली या नात्याने त्यांना शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरिता व इतर महत्वाच्या कामाकरिता आहेत अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालया कडे केला आहे.

त्या पेक्षा सदरहू अर्जदार हे मयत अशोक पिता रामचंद्र सोळंके यांचे वारस नव्हे असे समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरून असे कळविष्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार ह्यांच्या हककाबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत अशोक पिता रामचंद्र सोळंके यांच्या वारसाना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८/०४/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिकयानिशी दिले.


पुढील तारीख १०/०५/२०२४

स्वाक्षरीत/-
**लिपिक**

सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायलय क.स्तर धारूर**


दैनिक राज्य
लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
चांगलं खा....
स्वस्थ रहा...!
----: शुभेच्छुक :----
तापडीया परिवार
घाटसावळी ता.जि.बीड


अंबाजोगाई पिपल्स को-ऑप बँक म. अंबाजोगाई जि.बीड
दिनांक ३१ मार्च २०२४ अखेरची बँकेची आर्थिक स्थिती
सभासद संख्या १२०४१
वसूल भाग भांडवल १७ कोटी ६७ लाख
स्वनिधी ४४ कोटी ४८ लाख
गुंतवणूक २२२ कोटी ८४ लाख
एकूण ठेवी ५१४ कोटी ८७ लाख
एकूण कर्ज ४२० कोटी ६७ लाख
दैनिक राज्य लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
कार्यरत शाखा-१८, विस्तारीत कक्ष-२
अंबाजोगाई, जोगाईवाडी, बीड, गेवराई, माजलगांव, सिरसाळा, छ.संभाजीनगर - १) सिडको २) उस्मानपुरा ३) सातारा परिसर, जालना, कळंब, लातूर, औसा, उदगीर, अहमदनगर, पुणे (वाघोली) अंबाजोगाई (चौसाळकर कॉलनी), जामखेड विस्तारीत कक्ष : १) मोदी लर्नींग सेंटर, २) इंजिनिअरींग कॉलेज, अंबाजोगाई
कोअर बँकिंग, सेफ डिपॉझीट, लॉकरची सुविधा
भारतामध्ये सर्व शहरात देय D.D. ची सुविधा
RTGS / NEFT
Balance Enquiry No.8306101111 (Toll Free)
National Automated Clearing (NACH)
Rupay ATM व Insta Card सुविधा
तात्काळ सोने तारण कर्ज (१० % व्याज दर)
सर्व ठेवी विम्याने सुरक्षित
लेखा परिक्षण वर्ग 'अ'
तत्पर व विनम्र सेवा आणि त्यात सायंकालीन सेवा
मुख्य कार्यालयासह १८ शाखा आणि २ विस्तारित कक्ष
शुभेच्छूक
राजकिशोर कांताप्रसाद मोदी
अध्यक्ष
प्रकाश बालचंद सोळंकी
उपाध्यक्ष
धनंजय मधुकर देशपांडे
मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व संचालक मंडळ
प्रा. वसंत चव्हाण, ॲड. विष्णुपंत सोळंके, अरुण काळे, पुरुषोत्तम चोकडा, सुरेश मोदी, ॲड. सुधाकर कराड, संकेत मोदी, शेख दगडूभाई शेख दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा, हर्षवर्धन वडमारे, प्राचार्या, श्रीमती वनमाला रेड्डी, सौ. स्नेहा हिवरेकर, प्रा. लक्ष्मण दासूद, सचिन बेंबडे.
ULTIMATE SERVICES/9881747817


आमचे दैवत
दैनिक राज्य
लोकतंत्र
द्वितीय वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा
----: शुभेच्छुक :----
ॲड.सुभाष राऊत
(प्रदेश उपाध्यक्ष-अखिल भारतीय समता परिषद महाराष्ट्र राज्य)
सिनेट सदस्य-डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर


दैनिक राज्य
लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा
----: शुभेच्छुक :----
प्राचार्य श्री.सारोक्ते देवराम गोगा
जय जवान मा.व उच्च मा.विद्यालय, कवडगांव (बु)
ता.वडवणी जि.बीड
सर्व शिक्षक कर्मचारी वृंद कवडगांव (क) ता.वडवणी जि.बीड


दैनिक राज्य
लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा
----: शुभेच्छुक :----
मा.श्री.शेषेराव (बापु)
जगताप
नगर अध्यक्ष नगरपंचायत वडवणी
ता.वडवणी जि.बीड


दैनिक राज्य
लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा
----: शुभेच्छुक :----
प्रा.वैजेनाथ शिंदे
(ओ.बी.सी.नेते बीड जिल्हा)


जनविकास बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित
ज्ञानगंगा & शिवालय गुरुकुल
वडवणी ता. वडवणी जि. बीड संपर्क. 9403207077
दैनिक राज्य
लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
----* शुभेच्छुक *----
प्रा.व्ही.एस.डोईफोडे सर
ज्ञानगंगा ॲण्ड शिवालय गुरूकुल
ॲण्ड क्लासेस, वडवणी
मो.९४०३२०७०७७


दिपस्तंभ गुरुकुल
संचालक:-एस बी मुंडे सर
(DT ed,Agree Polytecnic)
9067750777
दैनिक राज्य
लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
----: शुभेच्छुक :----
प्रा.एस.बी.मुंडे सर
दिपस्तंभ गुरुकूल वडवणी
मो.९०६७७५०७७७


दैनिक राज्य
लोकतंत्र
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
सौ.कल्पना विधाते
वनरक्षक पिंपरखेड बिट
ता.आष्टी. जि.बीड.

# देशात पहिल्यांदाच सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे

## मूळ संकल्पना पुण्याची; पुणे शहरातील ३५ गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे- जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा यासाठी कमी मतदान असलेल्या शहरांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांत मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली असून असा उपक्रम देशात प्रथमच राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची मूळ संकल्पना पुणे जिल्ह्याची असून पुणे शहरातील ३५ गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे स्थापन करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

जिल्ह्यातील ४ लोकसभा मतदार संघांच्या निवडणुकीचा निवडणूक कार्यक्रम सुरू आहे. त्यानुसार बारामती लोकसभा मतदार संघाची अधिसूचना १२ एप्रिल रोजी प्रसिद्ध होणार आहे तर नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत १९ एप्रिल २०२४ अशी आहे. बारामती मतदार संघात नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम मुदत २२ एप्रिल आहे. पुणे, शिरुर आणि मावळ मतदार संघांची अधिसूचना प्रसिद्धी १८ एप्रिल रोजी, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची अंतिम मुदत २५ एप्रिल तर उमेदवारी मागे घेण्याची अंतिम मुदत २९ एप्रिल २०२४ अशी आहे.

आजपर्यंत पुणे जिल्ह्यात ४३ लाख २८ हजार ९५४ पुरूष, ३९ लाख ६३ हजार २६९ स्त्री तर ७२८ तृतीयपंथी अशा एकूण ८२ लाख ९२ हजार ९५१ मतदारांची नोंद झाली आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी अर्ज क्र. ६, आणि स्थलांतरणासाठी अर्ज क्र. ८ सादर करण्याची अद्यापही संधी असून बारामती मतदार संघात ९ एप्रिलपर्यंत तर अन्य तीन मतदार संघात १५ एप्रिलपर्यंत आलेल्या अर्जांवर निवडणूक




प्रशासनाकडून कार्यवाही केली जाणार आहे. अंतिम मतदारसंख्या त्यावेळी निश्चित होईल.

सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. ५ किंवा ५ पेक्षा जास्त मतदान केंद्रे असलेल्या इमारतीमध्ये वाहनतळाची व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, पाळणाघर, स्त्रीयांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह आदी ठळक सुविधांसह अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. मतदारांना मतदान केंद्राची माहिती देण्यासाठी शहरी भागात प्रत्येक वॉर्ड कार्यालयात मदत केंद्र स्थापन करण्यात येणार आहे.


जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघात बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट वितरणाचे कामकाज कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्नधान्य महामंडळाच्या गोदामातील मतदान यंत्र वितरण केंद्रातून राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत वितरण सुरू झाले आहे.

मावळ लोकसभा मतदार संघाची मतमोजणी श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे आणि बारामती लोकसभा मतदार संघाची मतमोजणी कोरेगाव पार्क येथील भारतीय अन्नधान्य महामंडळाच्या गोदामात तर शिरूर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी रांजणगाव (कोरेगाव) औद्यागिक वसाहतीतील महाराष्ट्र वखार महामंडळाच्या गोदामात होणार आहे. सर्व मतमोजणी केंद्राची प्रशासन, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, अग्नीशमन यंत्रणा आदी विभागांनी सुरक्षतेच्यादृष्टिने संयुक्त पाहणी केली आहे. प्रत्येक विधानसभा मतदार संघात नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रिया, ईव्हीएम हाताळणीबाबतचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. निवडणूकीच्या कामकाजासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध असून लोकसभा निवडणूक शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व नियोजन करण्यात आले आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# पुण्यातील तरुण नोकरीसाठी अमेरिकेत गेला अन् जहाजावरुन बेपत्ता झाला

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील प्रणव कराड हा तरुण अमेरिकेतून बेपत्ता झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. हा तरुण अमेरिकेत एका जहाजावर कॅडेट म्हणून कार्यरत होता. शुक्रवारी अचानकपणे त्याचा त्याच्या कुटुंबाशी संपर्क तुटला आणि



तो बेपत्ता झाला. या घटनेने कराड कुटुंबीय चिंतेत आहे. प्रणव हा विल्समन शिप मॅनेजमेंट प्रायवेट लिमिटेड या कंपनीत काम करत होता. काही दिवसांपूर्वीच तो अमेरिकेत गेला होता.

३ दिवसांपासून बेपत्ता

मिळालेल्या अधिक माहितीनुसार, विल्समन शिप मॅनेजमेंट प्रायवेट लिमिटेड या कंपनीत प्रणव काम करत होता. येथे तो शिफ्ट डेस्कला काम करायचा. गेल्या ३ दिवसांपासून प्रणव बेपत्ता असल्याचं त्याच्या वडिलांनी सांगितलं आहे. मुंबईतल्या कंपनीने प्रणवचा शोध सुरू केला आहे. प्रणव बेपत्ता असल्याची माहिती दिल्यानंतर आतापर्यंत मुंबईतील कंपनीने कोणतीही समाधानकारक माहिती दिलेली नाही, असंही त्याच्या वडीलांनी सांगितलं आहे. गोपाळ कराड असं बेपत्ता तरुणाच्या वडिलांचं नाव आहे.

# धक्कादायक! सामोस्या मध्ये टाकले निरोध, दगड अन् गुटखा खाद्य पदार्थ पुरवणाऱ्या कंपनी मालकासह ५ जणांवर गुन्हा दाखल

**चिखली । प्रतिनिधी**

खाद्य पुरवठा करण्याचा करार रद्द केल्याच्या रागातून खाद्य पदार्थ पुरविणाऱ्या कंपनीच्या मालकाने कामगारांच्या मदतीने कटकारस्थान करून समोस्यात निरोध, दगड अन् गुटखा टाकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कंपनी मालकासह पाच जणांवर गुन्हा दाखल करुन एका कामगाराला अटक केली आहे. हा प्रकार स्पाईन रोड चिखली येथील कंपनीच्या कॅन्टीनमध्ये २७ मार्च रोजी सकाळी साडेसात ते पावणे नऊच्या दरम्यान घडला आहे.

याबाबत किर्तीकुमार शंकरराव देसाई (वय-३६ रा. पाटीलनगर, बालेवाडी, पुणे) यांनी रविवारी (दि.७) चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी एसआरएस एंटरपायझेसचे मालक रहीम शेख, अझर शेख, मझर शेख (रा. मोरवाडी, पिंपरी) कामगार फिरोज शेख उर्फ मंटु, विकी शेख यांच्यावर भा.दं.वि. कलम ३२८, १२०(ब) ३४ नुसार गुन्हा दाखल करुन फिरोज शेख उर्फ मंटु याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे औंध येथील कॅटॅलीस्ट सर्व्हिस सोल्युशन्स पार्टनर्स प्रा. लि. कंपनीत सहायक महाव्यवस्थापक म्हणून नोकरी करतात. त्यांच्या कंपनीला चिखली येथील एका मोठ्या कंपनीत खाद्य पदार्थ पुरवण्याचे कंत्राट मिळाले आहे. फिर्यादी यांच्या कंपनीने आरोपींच्या मोरवाडी येथील एसआरएस एंटरप्रायझेस या कंपनी सोबत करार करुन चिखली येथील कंपनीला समोसा पुरवण्याचे कंत्राट दिले होते.

आरोपींकडून पुरवण्यात येत असलेल्या समोस्यात प्रथमोपचार पट्टी सापडली. त्यामुळे फिर्यादी यांच्या कंपनीने आरोपींसोबत असलेला करार रद्द केला. त्यानंर फिर्यादी यांच्या कंपनीने पुण्यातील मनोहर एंटरप्रायझेस या कंपनी सोबत करार केला. याचा राग आल्याने एसआरएस एंटरप्रायझेस चे मालक रहीम शेख, अझर शेख व मझर शेख यांनी कट रचला.

आरोपींनी त्यांच्याकडील कामगार फिरोज व विकी यांना समोसा पुरवणाऱ्या मनोहर एंटरप्रायझेस कंपनीत रोजंदारीवर कामाला पाठवले. फिर्यादी यांच्या कंपनीला मिळालेले कंत्राट रद्द होण्यासाठी एसआरएस एंटरप्रायझेसच्या मालकांच्या सांगण्यावरुन फिरोज व विकी यांनी समोस्यात निरोध टाकून किळसवाणा प्रकार केला. तसेच दगड व गुटखा टाकला. हा प्रकार समजाताच फिर्यादी यांनी चिखली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरुन एका कामगाराला अटक केली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# मावळचा उमेदवार मी पाठविलेला' अजित पवार यांचे स्पष्टच विधान

**पुणे । प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा समन्वय मेळावा सोमवारी (८ एप्रिल) काळेवाडी येथे पार पडला. कोणत्याही परिस्थितीत मावळमधून महायुतीचा उमेदवार निवडून आला पाहिजे. गेल्यावेळी पेक्षा जास्त मताधिक्य मिळाले पाहिजे. आपला विरोधी उमेदवार संजोग वाघेरे यांच्याशी अनेक वर्षाचे संबंध आहेत. परंतु, निवडणुकीची प्रचार यंत्रणा सुरू झाल्यावर काही गोष्टी पाळाव्या लागतात. १३ तारखेचे मतदान होईपर्यंत विरोधी उमेदवाराला भेटायला जाऊ नका, गप्पा-टप्पा मारायला जाऊ नका, निवडणूक काळापर्यंत नातेसंबंध बाजूला ठेवावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना केले. वाघेरे सांगत आहेत की, मीच त्यांना तिकडे पाठवले, लढायला




लावले. हे सगळे खोटे असून अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहनही त्यांनी केले. मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत, महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, सुनील शेळके, उमा खापरे, आठवले गटाच्या चंद्रकांता सोनकांबळे यावेळी उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले की, काळ बदलला आहे. आता विकासाच्या राजकारणावर भर दिला पाहिजे. विकासाची वज्रमूठ बांधली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मोदी यांच्या हाती देश सुरक्षित आहे. जगाची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर आणायची आहे. त्यासाठी तिसऱ्यांदा मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करायचे आहे. विकास कामे मतदारपर्यंत पोहोचवावीत. दहा वर्षांत जगाची मोठी प्रगती झाली आहे. याला गॅरंटी म्हणतात. पक्षाला, उमेदवारी मिळाली नाही म्हणून असंतुष्ट राहू नये, विरोधी पक्षाकडे पंतप्रधान पदासाठी चेहरा नाही. ही निवडणूक विचारांची नव्हे विकासाची आहे. प्रत्यक्षात कृतीत येऊ शकत नाहीत, अशी आश्वसने विरोधकांनी दिली आहेत.

महिलेच्या खात्यात एक लाख रुपये टाकायचे हे दिलेले आश्वसन शक्य आहे का, ही निवडणूक तरुणांचे भवितव्य ठरवणारी आहे. विरोधकाकडे कोणताही मुद्दा नाही. संविधान बचाव, देश बचाव असे मोर्चे काढले जात आहेत. जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहे, तोपर्यंत कोणीही संविधान बदलू शकत नाही. काहीजण म्हणतात यापुढे निवडणूक होणार नाही. ही शेवटची निवडणूक, येथून पुढे हुकूमशाही येणार, असे मते मिळविण्यासाठी काहीही बोलतात. एवढ्या मोठ्या देशात निवडणूक न होणे हे शक्य आहे का?, असेही पवार म्हणाले.

# ‘महायुतीच्या बैठकीत निगेटिव्ह बोलणाऱ्यांनी जेवून घरी जावं’, चंद्रकांत पाटील असं का म्हणाले?

**पुणे । प्रतिनिधी**

मावळ लोकसभेचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणेंच्या प्रचारासाठी आज समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांना तंबीच घातली. महायुतीच्या बैठकीत निगेटिव्ह बोलणाऱ्यांनी जेवून घरी जावं, असे त्यांनी पदाधिकाऱ्यांना सुनावले.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, ज्यांना निगेटिव्ह बोलायचं त्यांनी माझ्या कानात बोलावं. जाहीर निगेटिव्ह बोलणाऱ्यांनी तातडीनं जेवणाचा मेनू पाहावा आणि जेवून घरी जाऊन बसावं. तसेच इथून बाहेर गेलातचं, तर मीडियामध्ये ही अजिबात निगेटिव्ह बोलायचं नाही, असे त्यांनी म्हटले.

निगेटिव्ह बोलणाऱ्यांनी तातडीने घरी जावं

ते पुढे म्हणाले की, दिवसभर मीडियात दिसलं की तुम्हाला मज्जा येते. यापेक्षा निगेटिव्ह बोलणाऱ्यांनी इथून जेवून तातडीनं घरी जावं, मी त्यांना तशी परवानगी देतो आहे. निगेटिव्ह बोलणाऱ्यांचे असे कान टोचत पाटलांनी भरपूर बोला, पण पॉझिटिव्ह बोला असा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

मानसन्मान बाजूला ठेवून काम करावे - उदय सामंत



उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उमेदवार आहेत असे समजून महायुतीच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. उद्धव ठाकरे यांनी कधीच कार्यकर्त्यांची दुःखे जाणून घेतली नाही. स्वतःचा चेहरा देखील कोणाला दाखवत नव्हते. मावळमध्ये सहाही आमदार महायुतीचे आहेत. या आमदारांच्या मताधिक्याची बेरीज केल्यास बारणे हे मागील वेळेपेक्षा अधिक मतांनी निवडून येतील. गट-तट, मान - अपमान विसरून जा. मानसन्मान बाजूला ठेवून काम करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

देशाच्या विकासासाठी आम्ही भाजपसोबत - अनिल पाटील

मंत्री अनिल पाटील म्हणाले की, देशाच्या विकासासाठी आम्ही भाजपसोबत आलोय. उमेदवार कोण आहे, याच्याशी काही देणे घेणे नाही. नेत्याने घेतलेल्या निर्णयासाठी झोकून देऊन काम करावे. आमदार सुनील शेळके म्हणाले की, मावळमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेची लढत झाली आहे. महाविकास आघाडीचा उमेदवार आपल्या अगोदर जाहीर झाला आहे. त्यांचा एक दौरा पूर्ण झाला आहे. आपण पाठीमागे आहोत. महायुती म्हणून आपल्याला संयुक्तपणने बूथ प्रमुखांची बैठक घेतली पाहिजे.

# भाजपच्या ’सगळंच आम्ही केलं’ प्रचाराला शरद पवारांचं उत्तर; फडणवीसांच्या मोदी फॅक्टरने लढाईचं मैदानच बदललं, बारामतीत दोन चाणक्यांची चढाओढ

**पुणे । प्रतिनिधी**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील सर्वात प्रतिष्ठेची लढाई म्हणून पाहिल्या जाणाऱ्या बारामती मतदारसंघातील प्रचाराची हवा आता चांगलीच तापली आहे. बारामतीच्या रिंगणात मविआच्या सुप्रिया सुळे विरुद्ध महायुतीच्या सुनेत्रा पवार उमेदवार असल्या तरी खरी लढाई ही राज्यातील दोन राजकीय चाणक्यांमध्ये होणार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीमधून अजित पवार यांच्या पत्नीला उमेदवारी देऊन शरद पवार गटासमोर मोठे आव्हान निर्माण केल्याची चर्चा आहे. यापूर्वी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस आणि शरद पवार या दोन नेतृत्त्वांमध्ये लढाई झाली होती. त्यावेळी शरद पवारांनी फडणवीसांना धोबीपछाड दिला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा बारामतीच्या निमित्ताने हे दोन चाणक्य आमनेसामने उभे ठाकले आहेत.

शरद पवार यांची सोमवारी बारामती मतदारसंघातील सुपे येथे सभा झाली. यावेळी शरद पवार यांनी भाजपकडून करण्यात येणार विकासाचे दावे कसे फोल आहेत, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. तर देवेंद्र फडणवीसांनी पवारांच्या या मुद्द्याला बगल देत बारामतीची निवडणूक थेट राष्ट्रीय पातळीवर नेण्याचा प्रयत्न केला. सुप्रिया सुळेंना मत म्हणजे राहुल गांधींना मत आणि सुनेत्रा पवारांना मत म्हणजे नरेंद्र मोदींना



मत, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

बारामतीचा विकास आमच्या काळात झालाय, भाजपच्या काळात नाही? शरद पवारांचा दावा

एकेकाळी पुण्यात फक्त पिंपरी-चिंचवडला कारखाने होते. पण तुम्ही आमच्या हातात सत्ता दिली तेव्हा आम्ही फक्त पिंपरी-चिंचवडपुरता मर्यादित राहिलो नाही. आम्ही जेजुरी, सासवडला कारखाने काढले, बारामतीला एमआयडीसी सुरु केली, इंदापूरला एमआयडीसी काढली, कुरकुंभला एमआयडीसी काढली, रांजणगावला एमआयडीसी सुरु केली आणि पुण्याजवळ हिंजवडी येथे आयटी पार्क उभारले. या माध्यमातून या परिसरातील जवळपास १ लाख लोकांना रोजगार प्राप्त करुन दिले. हे आताच्या सरकारने केलं नाही, हे आम्हा लोकांच्या हातात सत्ता असताना झालं, त्यामुळे हजारो मुलांना काम मिळालं.

दुष्काळी भागातील मुलं एमआयडीसीत कामाला जायला लागल्याने त्यांच्या घरातील परिस्थिती बदलली. हा बदल आमच्या सरकारने केला, आजच्या सरकारने केला नाही. ५६ वर्षांपूर्वी मी पहिल्यांदा महाराष्ट्राच्या विधानसभेत निवडून आलो. त्या काळात काय स्थिती होती, सुप्यात त्यावेळी वेगळी परिस्थिती होती. पण गेल्या काही वर्षांमध्ये सुप्यातील परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. मुली शिकल्याचा परिणाम घरातील राहणीमान सुधारण्यात झाला. हा बदल भाजपवाल्यांनी केला नाही. आज सुप्यामध्ये इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. ही शाळा कोणी बांधली? विद्या प्रतिष्ठान संस्था कोणी सुरु केली?, असे सवाल शरद पवारांनी विचारले. आणखी काही वर्षांनी सुप्याच्या इंग्रजी शाळेतील मुलं राज्याच्या वेगवेगळ्या कंपनीत काम करतील, हे चित्र पाहायला मिळेल.

# रयत माऊली लक्ष्मीबाई यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार केला-प्रा. डॉ. नीता मोहिते

**पिंपरी । प्रतिनिधी**

रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी सामाजिक समतेचा पुरस्कार केला. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वावर छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे महाराज, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांच्या कार्याचे अनुसरण त्यांनी केले. सामाजिक समता प्रस्थापित केली, वर्गव्यवस्था आणि जातीव्यवस्थेला तडा दिला. त्यांच्या एकूणच कार्यात लक्ष्मीबाईंनी सावलीसारखी साथ दिली आणि सामाजिक समतेचा पुरस्कार केला. अठरापगड जातीच्या मुलांना आईची माया दिली. प्रसंगी बहुजनांच्या मुलांसाठी इतर दागिन्यांबरोबरच सौभाग्याचे लेणे असणारे मंगळसूत्रही खर्ची घातले, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या प्रा. डॉ. नीता मोहिते यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग आणि महिला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सदर प्रसंगी समाजप्रबोधनकार शारदाताई मुंडे यांनी लक्ष्मीबाई आणि कर्मवीरांच्या जीवनातील विविध प्रसंग एकपात्री प्रयोगाच्या माध्यमातून साभिनय सादर केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. माधव सरोदे होते. त्यांनी लक्ष्मीबाईंच्या असीम त्यागाची माहिती देत थोरा-मोठ्यांचे विचार आजच्या तरुणाईने आचरणात




आणावेत असे आवाहन केले.

सामाजिक बांधिलकी आणि सामाजिक सामिलकीच्या भूमिकेतून रयत शिक्षण संस्थेच्या धानिणीच्या बागेत असणाऱ्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर सेवकांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जमा केलेल्या निधीतून ११०००/- रुपये निधीचा चेक प्रो. डॉ. माधव सरोदे यांच्या शुभहस्ते रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य डॉ. दत्तात्रय हिंगणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

महाविद्यालयातील काही प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांना त्यांच्या विशेष शैक्षणिक कामगिरीबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रयत माऊली लक्ष्मीबाईंच्या पुण्यतिथी निमित्त ससून हॉस्पिटलच्या मदतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.सदर शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप नन्नावरे, राष्ट्रीय छात्र सेना लेफ्टनंट प्रा. प्रसाद बाठे यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपप्राचार्य डॉ. मृणालिनी शेखर यांनी प्रास्ताविक केले. अतिथींचा परिचय डॉ. वैशाली खेडकर यांनी करून दिला. कार्यक्रमास डॉ. नीलकंठ डहाळे, पर्यवेक्षिका प्रा. रूपाली जाधव, श्री नवनाथ शेवाळे, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वप्ना हजारे व प्रा. संग्राम गोसावी यांनी केले.

# पुण्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणीने जीवन संपवलं

पुणे : पुण्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणीने राहत्या हॉस्टेलवर गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. पुण्यातील गुरुवार पेठेत ही धक्कादायक घटना घडली असून त्यामुळे एकच खळबळ उडाल्याचं दिसंतय. अभिलाषा मित्तल (२७) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव असून ती मूळची वाशिम जिल्ह्यातील आहे. या प्रकरणी पुण्यातील खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तरुणीच्या अंगावर मारहाणीच्या खुणा असल्याचं प्राथमिक तपासात समोर आल्याने ही हत्या आहे का आत्महत्या याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, अभिलाषा मित्तल ही तरूणी मूळची वाशिमची असून गेल्याच महिन्यात ती स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी पुण्यात आली होती. पुण्यातील गुरुवार पेठेतील एका मुलींच्या हॉस्टेलमध्ये ती राहत होती.

आतून दरवाजा बंद करून गळफास घेतला

मैत्रिणीने दिलेल्या माहितीनुसार, अभिलाषा ही खोलीमध्ये एकटीच होती. तिने खोलीचा दरवाजा आतून बंद केला आणि गळफास लावून आत्महत्या केली. नंतर मैत्रिणीने दरवाजा उघडण्यासाठी प्रयत्न केला, पण आतून कुठलाच आवाज येत नव्हता. नंतर खिडकीतून पाहिले असता अभिलाषाने आत्महत्या केल्याचं दिसलं.

ही घटना उघडकीस येताच घटनास्थळी पोलिसांनी तातडीने धाव घेत तपास सुरू केला. अभिलाषाच्या अंगावर मारहाणीच्या काही खुणा सापडल्याने ही आत्महत्या आहे की हत्या आहे याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. पोलिसांनी अभिलाषाच्या नातेवाईकांची आणि मैत्रिणींची चौकशी केलीय.